CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ५ सोमवार दि. २३ जानेवारी २०२३ ते रविवार दि. २९ जानेवारी २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पत्नीने घटस्फोट मागताच पती चिडला भर रस्त्यात सासऱ्याचाच काटा काढला

जत/क्राईम रिपोर्टर



पती पत्नी मधील भांडणात दोन्ही कडच्या लोकांनी वेळीच मध्यस्थी केली नाही तर काहीही घडू शकते. अथणी जवळील एगली येथे राहणार सचिन बळोळी हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला दारू पिऊन मारहाण करीत असे. त्यामुळे ती माहेरी गेली आणि तिने पतीला घटस्फोट देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पती भयंकर चिडला आणि ...पान २ वर

## शिक्षकाने मानसिक छळ केल्याने जगण्याची इच्छा मेली १४ वर्षांच्या विद्यार्थीनीने गळफास घेऊन आत्महत्या केली

लातूर/क्राईम रिपोर्टर



शिक्षक हा सरस्वतीच्या मंदिरातील पुजारी असतो. कारण विद्यादानाचे पवित्र कार्य तो करीत असतो. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांचे केवळ गुरु शिष्याचेच नाते असते असे नाही तर त्याच्याकडे शिक्षण घेणारी सर्व मुले-मुली त्याच्या स्वतःच्या मुलासारखीच असतात. अशावेळी या मुलांना प्रेमाने वागवणे. त्यांना प्रत्येक विषय आपुलकीने समजावून सांगणे त्यांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर चांगले संस्कारही देणे हि शिक्षकाचीच जबाबदारी असते. पूर्वी गुरुकुळातील शिक्षक आपल्या शिष्यांना पित्याच्या मायेने शिकवायचे, त्यामुळे शिष्यांच्या मनातही गुरुविषयी आदर असायचा. आता मात्र कलयुगात परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. कारण शिक्षणाचे पूर्णपणे व्यावसायीकरण झालेले आहे. त्यामुळे शाळांपेक्षा खाजगी क्लासेसचे महत्व अधिक वाढलेले आहे आणि खाजगी शाळांमधील शिक्षक हे पूर्णपणे प्रोफेशनल असल्याने त्यांना विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी काहीच घेणेदेणे नसते. त्यामुळे त्यांच्या खाजगी क्लासमध्ये शिकणाऱ्या मुलांशी ते कधीच प्रेमाने वागत नाहीत. एखाद्या मुलाला किंवा मुलीला त्यांनी शिकवलेला विषय समजला नाही तर त्याला दुसऱ्यांदा समजावून सांगण्याऐवजी शिक्षक त्याच्याशी तुसडेपणाने वागतात, त्या मुलाचा किंवा मुलीचा सर्वांसमोर अपमान करतात, त्याचा अर्थातच त्यांच्या बालमनावर परिणाम होतो आणि त्यातून मुले टोकाचे पावूल उचलतात. लातूरमध्ये अशीच एक भयंकर घटना घडली आहे. खाजगी क्लासेस मधील शिक्षकाने शिकवलेले आपल्याला समजत नाही असे सांगून एका नववीतल्या मुलीने शिकवणी बंद केली त्याचा राग मनात ठेऊन तो शिक्षक त्या विद्यार्थीनीचा मानसिक छळ करू लागला आणि याच मानसिक छळाला कंटाळून त्या मुलीने आत्महत्या केली. सुसाईड नोटमध्ये तिने त्या शिक्षकाविषयी लिहून ठेवले आहे. या प्रकरणी मुलीच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




### आरोपी शिक्षकावर कारवाईस पोलिसांची टाळाटाळ!

शिक्षकाच्या मानसिक त्रासाला कंटाळून एक १४ वर्षांची मुलगी आत्महत्या करते, सुसाईड नोटमध्ये त्या शिक्षकामुळे आत्महत्या करीत असल्याचे तिने लिहून ठेवलेले आहे, तरीही या प्रकरणी शिवाजी नगर पोलिसांनी गुन्हा नोंद करण्यापलीकडे काहीच केलेले नाही. आरोपी शिक्षक मोकाट आहे. त्यामुळे पोलीस कारवाई करण्यास का टाळाटाळ करीत आहेत? आरोपी पळून जाण्याची किंवा अटक पुर्व जामीन घेण्याची वाट बघत आहेत का? असा संतप्त सवाल लातूरकर करीत आहेत. तसेच अशा प्रकरणात पोलिसांची असंवेदनशीलता आरोपीच्या पथ्यावर पडू शकते. त्यामुळे या प्रकरणी पोलिसांचीच चौकशी का करू नये असेही लातूरकर म्हणत आहेत!

संपूर्ण लातूरमध्ये खळबळ माजवणाऱ्या या घटनेबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे. लातूर शहरातील जुना औसा रोड भागात राहणारी श्रावणी संजय नाईक नवरे (१४) हि मुलगी लातूर शहरा जवळील पेठ येथील कीड्झ इंफोपार्क या शाळेत ९वी मध्ये शिकत होती. याच शाळेतील शिक्षक राहुल पवार याची रियल मॅथ्स ॲकेडमी नावाची खाजगी शिकवणी आहे. जून २०२२ पासून श्रावणी या शिकवणीला जात होती. मात्र दहा दिवसानंतर आपल्याला राहुल पवार याने शिकवलेले समजत नाही असे सांगून तिने क्लासला जाणे बंद केले. याच गोष्टीचा राहुल पवार याला राग आला आणि त्याने शाळेत तिचा मानसिक छळ सुरु केला. तिला वर्गात उभे करून कॉपी बहाद्दर म्हणून हिणवणे, बहानेबाज म्हणून सर्वांसमोर वर्गातून बाहेर काढणे. ...पान २ वर

## प्रेयसीच्या डबल गेमने लव्ह स्टोरीचा शेवट झाला पहिल्या प्रियकराने दुसऱ्या प्रियकराचा गेम केला





उल्हासनगर/किरण तेलगोटे

आपली वस्तू हि आपलीच असावी त्यावर दुसऱ्या कुणाची नजर पडू नये असे प्रत्येकालाच वाटत असते आणि प्रेमाच्या बाबतीत तर माणूस अधिकच संवेदनशील असतो. आपली प्रेयसी हिने आपल्याशीच संबंध ठेवावे दुसऱ्याचा विचारही करू नये अशी प्रत्येक प्रियकराची भावना असते, पण आजकाल तसे घडत नाही. कारण आजकालच्या मुली चंचल असतात. त्यामुळे ब्रेकअप आणि पॅचप हा त्यांच्या जीवनाचाच एक भाग असतो, पण हा एक प्रकारे भावनांशी खेळ असल्याने यातून एखाद्याच्या प्राणावरही बेतू शकते. कल्याण जवळच्या वठ्ठलवाडीत अशाच एका घटनेत प्रेयसीच्या मोबाईलमध्ये तिच्या पहिल्या प्रियकराचा नंबर आढळल्याने चिडलेल्या तिच्या दुसऱ्या प्रियकराने प्रेयसीच्या पहिल्या प्रियकराला जाब विचारायला गेला यावेळी झालेल्या वादात पहिल्या प्रियकराने दुसऱ्या प्रियकराची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

प्रेयसीच्या मोबाईलमध्ये पहिल्या प्रियकराचा नंबर आढळल्याने संतापलेल्या नवा प्रियकर जाब विचारण्यास गेला. यावेळी झालेल्या वादातून पहिल्या प्रियकराने आपल्या मित्रांच्या मदतीने भररस्त्यात चाकूहल्ला करत नव्या प्रियकराची हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. कल्याणमधील विठ्ठलवाडी परिसरात ही भयानक घटना घडली आहे. हत्या केल्यानंतर आरोपी मध्य प्रदेशात फरार झाले. मात्र पोलिसांनी वेगाने तपास करत २४ तासाच्या आत आरोपींना अटक केली आहे. आदित्य बरर असे हत्या करण्यात आलेल्या नवीन प्रियकराचे नाव आहे. ललित उज्जैनकर, राहुल चव्हाण, सागर गांगुर्डे, नकुल भोईटे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मुंबईच्या मानखुर्द गोवंडी परिसरात राहणाऱ्या आदित्य बरर याचे कल्याण विठ्ठलवाडी परिसरातील राहणाऱ्या एका तरुणीसोबत प्रेमप्रकरण सुरु होते. मात्र आदित्य आधी तिचे ललित नावाच्या मुलाशी प्रेमप्रकरण सुरू होते. हे रिलेशन जवळपास चार वर्षे सुरू होते. दोघांचं लग्नही ठरणार होते. मात्र ललित व्यसनांच्या आहारी गेलेला असल्यामुळे तरुणीच्या आईने त्यांच्या लग्नाला विरोध करत मुलीला दिव्यात आपल्या भावाकडे पाठवले. यादरम्यान ती आदित्यच्या संपर्कात आली. ही जवळीक वाढत गेली आणि या दोघांच प्रेम प्रकरण सुरू झालं. या दरम्यान दोन दिवसापूर्वी आदित्यला तिच्या मोबाईलमध्ये तिचा जुना प्रियकर ललित याचा नंबर मुलीच्या नावाने सेव केलेला दिसून आला. मग काय आदित्यचा पारा चढला. ...पान ६ वर

## दारूच्या नशेत भलतेच करायला गेला विकृत मित्राने मित्राचा निर्घृण खून केला

धुळे/क्राईम रिपोर्टर



लैंगिक विकृती माणसाला कुठल्याही थराला नेते. धुळ्यात एकटा राहणारा आणि सतत वेश्यांकडे जावून आपली शारीरिक भूक भागवणाऱ्या राहुल हरजन नावाच्या एका विकृत कामांधाने एके दिवशी चक्क आपल्या मित्रालाच दारू पाजून त्याच्याशी अनैतिक कृत्य करण्याचा प्रयत्न केला, पण त्याने विरोध करताच राहुलने त्याची हत्या केली. मात्र पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याचा शोध घेऊन त्याला अटक केली.

धुळे शहरातील बारा पत्थर परिसरात २ जानेवारी २०२३ रोजी नेहमीप्रमाणे सकाळपासूनच गजबजला होता. या परिसरातील जलकुंभानजीक सकाळी नऊ वाजेच्या सुमारास काही लोकांना अर्धनग्न अवस्थेत एका पुरूषाचा रक्ताळलेल्या अवस्थेतील एक मृतदेह आढळला. तो मृतदेह पहाण्यासाठी लोकांची गर्दी झाली. त्यातील काही लोकांनी शहर पोलीस स्टेशनला संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर कोळे, उप अधीक्षक ऋषीकेश रेड्डी, धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील या सर्वांनी तात्काळ आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी साधारण ४० वर्षाच्या इसमाचा मृतदेह पडलेला होता. त्याच्या डोक्याच्या डाव्या बाजूला गंभीर जखम होती. त्या जखमेतून रक्तस्त्राव होत होता. मयत इसमाच्या अंगावर केवळ शहर पोलीस स्टेशनला संपर्क अधीक्षक ...पान २ वर

## व्याजाच्या पैशावरून दोघांमधील वाद वाढला ऋषीकेशला दारू पाजून अथर्वने काटा काढला



मयत ऋषीकेश





कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

कोल्हापूर पैशाचे व्यवहार जर लवकर मिटवले नाहीत तर त्यातून वाद निर्माण होतात आणि मग हे वाद विकोपाला जाऊन एखाद्याच्या प्राणावरही बेततात. व्हिडीआ पार्लर चालवणाऱ्या ऋषीकेशकडे अथर्व नावाचा तरुण कामाला होता, अथर्वने ऋषीकेश याच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते, पण ते परत देत नसल्याने दोघांच्यात वाद सुरु होता. अखेर हा वाद कायमचा मिटवण्यासाठी अथर्वने मित्रांच्या मदतीने दारूची पार्टी आयोजित केली आणि त्यात ऋषीकेशही बोलावले त्या नंतर सर्वांनी त्याला दारू पाजली आणि तो नशेत असताना त्याला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

ऋषीकेश सुर्यवंशी हा स्टेशन रोडवरील एका व्हिडीओ पार्लरमध्ये कामाला होता. तो आपल्या आई वडिलासह शिंगणापूर येथे राहयला असून तो ही मागे एकदा मारामारीच्या प्रकरणात अडकलेला होता. त्याचेवर जुना राजवाडा व लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनमध्ये मारामारीचे दोन गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याचेवर सराईत गुन्हेगार असा शिक्का बसलेला होता.तसा तो ही वागण्यात टारगट असा होता. शरीर यष्टीने धड धाकट असल्याने तो कोणाला काही ऐकत नव्हाता. समोरच्याला का रे ला का रे म्हणणारा असल्याने त्याच्या नादाला कुणी लागत नव्हते. तो ज्या व्हिडीओ पार्लरमध्ये कामाला होता. तेथे अथर्व हावळ हा ही कामाला ...पान २ वर

## मध्यस्थी करणाऱ्याचा भांडणाऱ्यांनी घात केला दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा नाहक जीव गेला



मुंबई/एस.कुमार

आज काल माणसाचा काही भरोसा देता येत नाही. कारण कधी कोणाच्या हातून काय घडेल याचा नेम नाही. त्यामुळे कोणीही सहसा कुणाच्या भांडणात पडू नये. कारण जो भांडण सोडवायला जातो त्याचाच कधी कधी घात केला जातो. कामाठीपुरा येथील अशाच एका घटनेत दोघांमधील वाद सोडवायला गेलेल्या एका तरुणाला आपला जीव गमवावा लागला. कारण तो भांडण सोडवत असताना ज्यांचे भांडण सुरु होते, त्यातील एकाला राग आला आणि त्याने मध्यस्थी करायला गेलेल्या आमस कुरेशी या तरुणाला भोसकले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

भांडणात मध्यस्ती करणे जीवावर कसे बेतू शकते याचा प्रत्यय आणून देणारी नागपड्यातील घटना मनाला सुन्न करणारी असली तरी मानवी मनाला विचार करायला लावणारी आहे. १७ जानेवारी रोजी रात्री ८.३० ते १०.३० च्या दरम्यान मुंबईच्या नागपाडा परिसरातील शुक्लाजी स्ट्रीट, येथील फिगो इमारतीच्या आवारात व अरब गल्ली या इमारतीच्या बाहेर एका २५ वर्षीय तरुणावर व त्याच्या भावावर अज्ञात हल्लेखोरांनी चाकू आणि कोयत्याने हल्ला केला होता.या हल्ल्यात ते दोघेही भाऊ जबर जखमी झाले होते . त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. ...पान ६ वर

## दिराच्या सहवासासाठी पत्नीचा तोल गेला पतीला ठार मारून हार्टफेलचा बनाव केला



मयत आकाश

अकोला/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंधात गुरफटलेली स्त्री असो कि पुरुष आपले संबंध टिकवण्यासाठी आणि लपवण्यासाठी कोणत्याही थराला जातात. अशावेळी एकमेकांसाठी काहीही करायची त्यांची तयारी असते. अकोला शहरात एका महिलेचे तिच्या मावस दिराबारोबारच अनैतिक संबंध होते. मात्र एकेदिवशी दारूच्या नशेत तिच्या पत्नीने तिला मारायला सुरुवात करताच तिचा प्रियकर असलेल्या दिराला सहन झाले नाही आणि त्यानंतर दिराच्या मदतीने तिने पतीची हत्या केली आणि पतीचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्याचे सांगू लागले, पण परदेशातून आलेल्या मृताच्या मावस भावाला संशय आला आणि या खुनाला वाचा फुटली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी पत्नी आणि तिच्या दिराला अटक केली.





छोटा पडदा अर्थात टीव्हीवर दाखवल्या जाणाऱ्या विविध मालिकांमधे घरगुती कलह, अनैतिक संबंध, कट कारस्थान हे विषय दाखवले जातात. गृहीणींचे ...पान ६ वर

## घर मालकाचा राग त्याने मुलीवर काढला जन्मदात्या बापानेच मुलीचा मुडदा पाडला

गोवा/क्राईम रिपोर्टर

जेंव्हा आपण दुसऱ्याच्या घरात भाड्याने राहत असतो तेंव्हा तिथे चांगले वर्तन ठेवायचे असते. अन्यथा घरमालक कधीही घरातून बाहेर कडू शकतो. नेमकी हीच गोष्ट गोव्यातील चोडण येथे राहणाऱ्या मोहम्मद सलीमला काळात नव्हती. तो दारू पिवून सारखा पत्नीला मारहाण करायचा. त्यामुळे घरमालक वैतागला होता. एकदा त्याला बोलावून त्याने तंबी दिली, पण त्याचा त्याला वेगळाच संशय आला. घरमालकाचे आपल्या पत्नीशी अनैतिक संबंध असावे असे त्याला वाटू लागले, त्याने तसे बोलून दाखवताच घरमालक चिडला आणि त्याने मोहम्मद सालिमचे थोबाड फोडले आणि घर खाली करायला लावले. या गोष्टीचा त्याला इतका राग आला कि त्याने घर तर खाली केले, पण आपली मुलगीच घर मालकाला चुगल्या लावते असा संशय घेऊन त्याने मुलीची हत्या केली.



जुने गोवा चोडण येथे मोहमद सलीम हा पत्नी मुलासह राहयला आहे. त्याला सात मुले असून त्याचा उदर निर्वाह तो मोलमजुरी करून करीत होता. तो मुळचा बिहार राज्यातील गेल्या काही वर्षापूर्वी तो गोव्यात आला होता. ९ जानेवारी रोजी त्याने जुने गोवा पोलीसात आपली १२ वर्षीय मुलगी ज्युलिया ही बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. त्याने पोलीसांना मुलीचे कुणी तरी अपहरण केल्याचे सांगितले होते. त्या अनुषंगाने पोलीस ज्युलियाचा शोध घेत होते. पण तिचा शोध काही पोलीसांना लागत नव्हता. याकामी पोलीसांनी आपले गुप्त खबरे ही कामाला लावले होते. गुप्त खबऱ्यांनी दिलेल्यां माहितीवरून ज्युलिया हिचा खून मोहमद सलीम यानेच केला असल्याची माहिती पोलीसांना ...पान ६ वर

CMYK

## पान १ वरून....

### पत्नीने घटस्फोट मागताच पती...

पत्नीवरचा राग त्याने सासऱ्यावर काढून भर रस्त्यात सासऱ्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी जावयाला अटक केली आहे. जत तालुक्यातील दरीबडची येथील आप्पासो मल्लाड याची मुलगी तेजश्री हिचा विवाह कर्नाटकातील अथणी जवळील एगळी येथील सचिन रूद्राप्पा बळोळी याच्या बरोबर समाजाच्या रितीरिवाजानुसार झाला. त्यांच्या लग्नाला दोन वर्ष झाली नाही तोवर नवरा बायकोत या ना त्या कारणातून भांडणे सुरू झाली. सचिन हा तेजश्रीला दररोज दारू पिऊन येऊन मारहाण करीत तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता.तेजश्री ही दिसायला सुंदर आणि देखणी असल्याने सचिनच्या मनात तिच्या चारित्र्याचा संशय निर्माण झाला होता. तो तेजश्री हिला तुझे कोणाबरोबर कसले संबंध आहेत असे म्हणून शिवीगाळ करीत मारहाण करीत होता. सुरूवातीला तेजश्रीने त्याच्या मारहाणीकडे दुर्लक्ष करीत संसार सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. लग्नानंतर एक दोन मुले झाली की सगळे काही व्यवस्थीत होईल याची तिला खात्री होती. परंतु दिवसागणीक तिच्या चारित्र्याविषयी सचिनच्या मनात घर करून राहिल्याने संसार मार्गस्थ होण्याऐवजी तो विस्कटत होता. नवरा आपल्याला मारहाण करतो शिवीगाळ करतो, आपल्या चारित्र्यावर संशय घेतो याची माहिती तिने आपल्या आई वडिलांना दिली होती. त्यामुळे आप्पासो मल्लाड यांनी सुरूवातीला त्या दोघांना ही समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा तो प्रयत्न फसला. सचिनच्या मनात तिच्या चारित्र्याचा संशय पक्का झाल्याने तो तिला जास्तच शिवीगाळ करून मारहाण करीत त्रास देत होता. गेल्या दोन वर्षापूर्वी आप्पासो मल्लाड यांनी आपल्या भावकीतील लोकांना घेऊन एगळी येथे जाऊन जावाई सचिन आणि त्याच्या घरच्या लोकांची समजून घालून भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला.परंतु जावाई सचिन याने त्याच्या समोरच त्यावेळी बायको तेजश्रीचा अपमान करून तुमची मुलगी चांगल्या वळणाची नाही. ती बाहेरख्यालीपणाने वागते,तिचे बाहेर कोणाबरोबर तरी संबंध आहेत असे सांगून बायको सासरा यांना पाहुण्याच्या समोर खाली मान घालयला लावली होती. त्यावेळी रागाच्या भरात आप्पासो मल्लाड यांनी मुलगी तेजश्री हिला आपल्या घरी दरीबडची येथे घेऊन आले. दरीबडची येथील संख रस्त्यावर त्याची शेत जमीन असल्याने त्याच्या घरची परिस्थीती ही सधन होती. घरात कशाचीच कमतरता नसल्याने तेजश्री हिचा सांभाळ करायला त्यांना जड जात नव्हते. जावाई सचिन हा बायको माहेरी येऊन राहिल्यावर देखील गप्प राहिला नव्हता. तो संख येथे येऊन बायकोला सासऱ्याला दमदाटी करीत होता. यातून संख येथे दमदाटी करण्यास आलेल्या जावायला आप्पासो मल्लाड यांनी आपल्या भावकीतील लोकांच्या मदतीने मारहाण केली होती. त्यानंतर त्यांनी जत पोलीस ठाण्यात सचिन विरूध्द तक्रार दाखल केली. त्यावेळी पोलीसांनी त्याला बोलावून घेऊन समज देऊन परत संख येथे येवून बायकोला सासऱ्याला त्रास देऊ नकोस असे बजावले होते. तरी ही सचिन हा बायकोला आणि सासऱ्याला त्रास देण्यासाठी संख दरीबडची येथे वारंवार येत होता. यातून त्याच्या त्रासाला कंटाळून तेजश्री हिने नवऱ्याकडे घटस्फोटा करीत जत कोर्टात केस दाखल केली. तेजश्रीने आपल्या अशई वडिलाच्या सांगण्यावरून घटस्फोटासाठी कोर्टात केस केल्याचा गैरसमज सचिन याने करून घेतला. आता तो आपल्या नातेवाईकांना पै पाहुण्यांना घेऊन दरीबडची येथे येऊ लागला होता. त्याला बायकोला घटस्फोट दयायचा नव्हता. तो तिला नांदायला चल म्हणून सांगत होता.पण तेजश्रीने घटस्फोटासाठी कोर्टात केस दाखल केल्याने तिचे आई वडिल तिला नांदायल पाठवून दयायला तयार नव्हते. तेजश्री देखील सचिनबरोबर परत नांदायला जायला तयार नव्हती. तरी ही तो तिच्या माहेरी येऊन तिला व तिच्या आई वडिलांना त्रास देत होता. त्याचा हा त्रास इतका वाढला होता की तिचे आई वडिल आणि ती देखील त्याच्या त्रासाला कंटाळली होती. काही केले तरी सासरे आप्पासो आणि तेजश्री ऐकायला तयार नव्हते. त्याचे एका अर्थी बरोबर होते. कोर्टात घटस्फोटाची केस असताना बाहेर ही केस मिटवली तरी सचिन हा मागचे तसे पुढे करणार याची खात्री त्यांना होती. त्यामुळे त्याने व त्याच्या भावाने कितीही वेळा हे प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न केला तरी हे प्रकरण काही मिटत नव्हते. याचा राग सचिन याला येत होता. कोर्टात घटस्फोटापर्यत प्रकरण तेजश्री आणि तिच्या आई वडिलांनी घातले होते. त्यामुळे कोर्टाकडून तेजश्रीला नुकसान भरपाई दयावी लागणार आणि पोटगी ही दयावी लागणार या विचाराने सचिन त्रस्त झाला होता. त्याला कुठे तरी हे प्रकरण मिटवायचे होते म्हणून तो प्रयत्न करीत होता. पण आता सासरे मल्लाड हे प्रकरण मिटवायला तयार नव्हते. त्यामुळे याचा राग सचिन व त्याचा भाऊ मिलन बळोळी यांना आला होता. ते दोघे सारखे संख दरीबडची येथे येऊन मल्लाड यांना धमकी देत होते. तुम्ही जर तेजश्रीला नांदायला पाठवून दिले नाही तर तुम्हाला आणि तेजश्रीला जिंवत ठेवीत नाही अशी धमकीच त्यांनी दिली होती. त्यांच्या या धमकीला घाबरून तेजश्री हिने वडिलांच्या सांगण्यावरून परत जत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. यावेळी ही पोलीसांनी दोघा भावांना बोलावून घेत हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे तु कोर्टाकडून ये, असे सुनावले होते. बायको नांदायला येत नाही, सासरे तिला पाठवत नाहीत या विचाराने सचिन हा त्रस्त झाला होता. तो आणि त्याचा भाऊ सासरे आप्पासो मल्लाड याचेवर चिडूनच होते. कारण बऱ्याचवेळेला त्यांनी हे प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न केला होता. पण मागचा अनुभव लक्षात घेता आप्पासो मल्लाड हे मुलगी तेजश्रीला तिच्या सासारी नांदायला पाठवत नव्हते. गेली दोन तीन वर्ष हे प्रकरण घुमसत होते. वादाला वाद वाढतच चालला होता. आता सासरे आणि बायकोला ही कायमचा धडा शिकवायचा याचा विचार सचिन व त्याचा भाऊ मिलन यांनी केला. सासरा आप्पासो हे शेताकडून घराकडे कधी येतात आणि जातात हे सचिन याला माहित होते. शुक्रवार दि.६ जानेवारी रोजी रात्री ८च्या दरम्यान संख रस्त्यावरील आपल्या शेतातून आप्पासो हे सायकलीवरून दरीबडची येथील आपल्या घरी परत येत असताना सचिन व त्याचा भाऊ मिलन यांनी त्यांना रस्त्यात गाठले. त्याच्या सायकलीला दूधाची किटली होती. नुकतेच त्यांनी म्हैशीच्या धारा काढल्या होत्या. त्यावेळी रस्त्यात दबा धरून बसलेले सचिन आणि मिलन यांनी आप्पासो यांना अडवले. रात्रीच्या अंधारात त्यांनी समोर जावाई व त्याच्या भावाला बघून त्यांनी काय ओळखायचे ते ओळखले. सचिन आणि त्याचा मिलन यांनी तुम्ही तेजश्रीला का पाठवून देत नाही असे विचारणा करीत तुम्ही हे प्रकरण मिटविता का नाही असे म्हणत रस्त्यातच त्याचेशी वाद घालीत त्यांना मारहाण करायला सुरूवात केली.त्यावेळी रस्त्यावर कुणी नव्हते. सचिनला सासऱ्याचा राग आलेला होता. रागाच्यां भरात त्याने आपल्याकडील धारदार हत्याराने त्याचे मानेवर, छातीवर डोक्यावर सपासप वार केले. त्यासरशी आप्पासो हे रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडले. सायकल एका बाजुला दूधाची किटली एका बाजुला पडली. मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने आप्पासो यांचा जागीच मृत्यू झाला होता. ही घटना अवघ्या काही मिनिटात दोघा भावांनी घडवली होती. त्यांचा जागीच मृत्यु झाल्याचे बघून दोघा भावांनी आपल्या मोटार सायकलीवरून तेथून लागलीच पळ काढला.दरीबडची ते संख रस्त्यावर आप्पासो मल्लाड यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून एकाने या घटनेची माहिती आप्पासो यांच्या घरच्या लोकांना दिली.त्याच्या खूनाची बातमी ऐकून घटनास्थळी गावातील लोकांनी धाव घेतली. घटना स्थळावरील दृश्य ह्दयद्रायक असे होते. घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. कुणी तरी या घटनेची माहिती जत पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती मयत आप्पासो मल्लाड याच्या घरच्या लोकाकडून घेतली. मयताचा पंचनामा करून पोलीसांनी मृतदेह शवव्चिछेदनासाठी जत येथील सरकारी रुग्णायलयात पाठवून दिला. या घटनेचा तपास जत पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. ही घटना कोणत्या कारणातून कुणी केली असावी याची माहिती पोलीसांनी घेऊन तसा अदांज पोलीसांनी बांधला होता. मयत आप्पासो याच्या घरच्या लोकांनी जावाई सचिन बळोळी व त्याचा भाऊ मिलन बळोळी याच्यावर संशय व्यक्त केला होता. तेजश्री हिला नांदावयास पाठविण्याच्या कारणातून जावाई सचिन याने आप्पासो यांना धमकी दिली होती. याची माहिती ही त्यांनी पोलीसांना दिली होती. आरोपीच्या शोधासाठी पोलीसांची तीन पथके तयार करण्यात आली. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे एक पथक कर्नाटकातील अथणी येथील एगळी येथे गेले. तेथे स्थानिक पोलीसाच्या मदतीने पोलीसांनी मिलन बळोळी याला ताब्यात घेऊन जत पोलीस स्टेशनला आणले.तेथे त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी मयत आप्पासो मल्लाड यांची मुलगी तेजश्री हिने दिलेल्या फिर्यादीनुसार आप्पासो आण्णासो मल्लाड (वय ४८) याच्या खून प्रकरणी सचिन रूद्राप्पा बळोळी (वय २५) व त्याचा भाऊ मिलन रुद्राप्पा बळोळी (वय ३०) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला.या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी सचिन बळोळी हा फरार असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते.मिलन बळोळी यास पोलीसांनी कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.दरम्यान या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी सचिन यास पकडण्यात ही पोलीसांना यश आले. त्याला ही पोलीसांनी कोर्टासमोर हजर केले असता त्याला ही कोर्टाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीसांनी त्याचे कडून गुन्हयात वापरलेले धारदार हत्यार व दुचाकी गाडी जप्त केली. या घटनेचा तपास पो.निरी. राजेश रामघरे,पो.उप. निरी.जगताप, पोलीस नाईक आगतराव मासाळ यांनी केला.या घटनेचा पुढील तपास पो.उप. निरी.गायकवाड हे करीत आहेत. नवरा बायकोची भांडणे घटस्फोटापर्यत गेले की त्यातून अनर्थ हा घडतोच हेच या घटनेवरून दिसून येते.

### शिक्षकाने मानसिक छळ केल्याने...

प्रश्नांची उत्तरे बरोबर दिली तरी तिचा अपमान करून तिला त्रास देणे असे प्रकार राहुल पवार याने सुरु केले होते. त्यामुळे श्रावणीने हा प्रकार घरी सांगितला, त्यानंतर श्रावणीचे पालक तिच्यासह शाळेत गेले आणि त्यांनी मुख्याध्यापक प्रीती शहा यांची भेट घेऊन घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. यावेळी श्रीमती शहा यांनी तिची समजूत काढून तिला परत पाठवले. त्यानंतरही राहुल पवार याच्याकडून श्रावणीचा मानसिक छळवाद थांबला नाही. त्यामुळे श्रावनीने शाळेत जाने बंद केले आणि शेवटी १८ जानेवारी २०२३ रोजी राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेमुळे लातूरमध्ये मोठी खळबळ माजली. पोलिसांना सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये राहुल पवार मला त्रास देत असल्याने या त्रासाला कंटाळून मी आत्महत्या करीत असल्याचे श्रावणीने म्हटले आहे. त्यामुळे राहुल पवार याला तत्काळ अटक करण्याची मागणी लातूरकर करीत आहेत, पण घटनेला चार दिवस उलटून गेले तरी पोलिसांनी अजून आरोपीला अटक केली नाही. या प्रकरणी श्रावणीच्या मातोश्री वर्षा संजय नाईकनवरे यांच्या फिर्यादीवरून लातूरच्या शिवाजी नगर पोलीस ठाण्यात २५/२०२३ कलम ३०६ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दारूच्या नशेत भलतेच करायला...

संजय बारकुंड, अप्पर शर्ट होता. त्याची पँट तेथेच काही करण्यात आला. साधून घटनेची माहिती दिली. पोलीस अधीक्षक किशोर कोळे, अंतरावर पडली होती. मृतदेहाची पाहणी करून पोलिसांनी घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा केला. मृतदेहाशेजारी काही अंतरावर पडलेल्या पँटच्या खिशात मृतकाचे आधार कार्ड, मोबाईल खरेदी केल्याची पावती होती. ती पोलिसांनी ताब्यात घेतली. आधार कार्डवर आणि मोबाईल खरेदीच्या पावतीवर विजयकुमार झिनत गौतम असे नाव होते. तसेच आधार कार्ड आणि पावतीवर आत्मज झिन्नत, मसजिदिया पकडी, जि. सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश असा पत्ताही होता. जागेवरच मृतकाची ओळख पटल्याने पोलिसांनी सुस्कारा सोडला, कारण या आधारावरच पुढील तपास सोयीस्कर होणार होता. मृतदेह पोस्टमार्टमसाठी रवाना करण्यात आला. यानंतर पुढील तपास शह पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंदराव कोकरे आणि स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना तपासाचे निर्देश देण्यात आले. तपासाचा भाग म्हणून तपास पथकाने विजयकुमार ज्या भंगार बाजारात हमालीचे काम करत होता, त्या भंगार बाजारातील हमाली काम करणारे आणि ज्याच्याकडे विजयकुमार हमाली काम करत होता त्यांचे प्राथमिक जबाब नोंदवून घ्यायला सुरूवात केली. यामध्ये आढळून आले की गेल्या दोन महिन्यापासून विजयकुमार भंगार बाजारात हमालीचे काम करत होता. अधिक तपास केला असता विजयकुमार हा राहुल अवधराम हरजन य उत्तरप्रदेशातीलच हमालाबरोबर हमालीचे काम करत होता. दोघे एकत्र असत अशी माहिती हेमंत पाटील यांना मिळाली. पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी राहुल हरजन याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण तो गायब असल्याचे आढळून आले. दरम्यान दुसऱ्या शोध पथकाने विजयकुमारचा मृतदेह ज्या परिसरात पडला होता. त्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यातील चित्रण तपासण्याची मोहिम फत्ते केली. त्यामध्ये एक तरूण अतिशय घाईघाईने एका वाहनात बसण्याचा प्रयत्न करत असल्याचे तपास पथकाला दिसून आले. जो इसम वाहनात घाई-घाईने बसण्याचा प्रयत्न करत होता. त्याच्या देहबोलीवरून तो भेदरलेला दिसत होता, त्यामुळे स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या तपास पथकाच्या संशयाची सुई वाहनात बसणाऱ्या त्या इसमावर स्थिरावली. संबंधित तपास पथकाने सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यातील त्या फुटेजमधील त्या तरूणाचा फोटो भंगार बाजारातील हमालांना आणि दुकानदारांना दाखवला असता तो इसम राहुल अवधराम हरजन असल्याचा व तो विजयकुमारबरोबरच रहात असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. राहुल हरजनचा मित्र मुंबईस्थित पनवेल परिसरातील कळंबोली येथे रहात असल्याचे व त्या मित्राकडे अधून-मधून जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हा. अन्वेषण विभागाच्या पथकाला मिळाली. हातात तपासाचे धागे-दोरे मिळाल्याने पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी आत्तापर्यतच्या तपासाची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक विश्वास काळे यांना दिली. राहुल हरजन हा संशयित आरोपी असू शकतो हे लक्षात येताच त्याला तात्काळ ताब्यात घेण्याच्या सुचना वरीष्ठांनी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना दिल्या. सुचनांची अंमलबजावणी करत हेमंत पाटील यांनी एक पथक तात्काळ पनवेलला रवाना केले. प्राप्त माहितीनुसार तपास पथकाने गोपनीयता ठेवत कळंबोली गाठले व बेसावध राहुल हरजनला ताब्यात घेवून चौकशीसाठी धुळ्याला आणले. चौकशी दरम्यान राहुल हरजनने नरो वा कुंजरोवाची भूमिक घेतली, पण चौकशी पथकाच्य प्रश्नांच्या भडीमारापुढे त्याच टिकाव लागला नाही. त्याचे उसने अवसान गळून पडले व तो बोलता झाला. राहुल हरजन हा अट्टल मद्यपी. त्याला बाहेरख्यालीची सवय. कामांध राहुल आपली शारिरीक भूक भागवण्यासाठी अधून-मधून अमळनेर येथील वेश्या वस्तीत जात असायचा. विजयकुमार गौतम काम- धंद्याच्या निमित्ताने उत्तरप्रदेशातून धुळ्यात आला. तो राहुल हरजन याच्या सहवासामध्ये राहू लागला. साहजिकच विजयकुमारही राहुल हरजनसोबत मद्यपान करायला लागला होता. विजयकुमार हमाली करायला लागल्यापासून मिळणारे पैसे संचित करत होता. दोन-तीन महिन्यामध्ये संचित झालेल्या पैशातून त्याने मोबाईल खरेदी केला होता. उर्वरित पैसे तो आपल्याजवळच बाळगत होता हे राहुल हरजनला माहित होते. दि. ३१ डिसेंबर २०२२ रोजी वर्षअखेर साजरा करून नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी राहुल हरजन हा विजयकुमारला सोबत घेवून अमळनेरला गेला. तेथे राहुलने व विजयकुमारने वेश्यागमन केले. सायंकाळी राहुल हरजन आणि विजयकुमार गौतम धुळ्यात आले. राहुल विजयकुमारला घेवून गावठी दारूच्या अड्डयावर गेला. तेथे राहुलने दारू प्राशन केली व विजयकुमारलाही भरपूर दारू पाजली. मद्यधुंद अवस्थेत राहुलची कामवासना जागृत झाली. तो अस्वस्थ झाला. रात्रीच्या अंधारात राहुल विजयकुमारला घेवून बाराफत्तर परिसरातील जलकुंभाजवळील निर्जन जागी आला. विजयकुमारला दारू जास्त झाल्याने तो झोकांड्या खात राहुलसोबत रात्रीच्या अंधारात त्या निर्जनस्थळी आला. राहुल कामवासनेने पागल झाला होता. मद्यधुंद अवस्थेतील विजयकुमारला राहुलने जमिनीवर झोपवले. त्याच्या अंगावरची पँट काढली व विजयकुमारशी अनैसर्गिक संभोग करण्याची तो धडपड करू लागला. राहुलच्या या विकृत वागण्याला विजयकुमार त्याही अवस्थेत विरोध करत होता, पण कामवासनेने हैवान झालेला राहुल त्याला दाबून, अनैसर्गिकरित्या शारिरीक भूक भागवण्याचा जबरीने प्रयत्न करत होता. विजयकुमार राहुलला परावृत्त करण्याचा प्रयत्न करत असतांना विजयकुमारची लाथ राहुलच्या गुप्तांगावर जोरात बसली. त्या लाथेने तो विव्हळला. अस्वस्थ झाला. गुप्तांगावर प्रहार झाल्याने ते दुखणे त्याला असह्य झाले. त्या संतापात राहुलने परिसरातील झाडाची फांदी तोडली आणि त्या फांदीने विजयकुमारच्या मस्तकावर प्रहार केला. मस्तकावर झालेल्या प्रहाराने विजयकुमारच्या डोक्यात गंभीर जखम झाली. त्यातून रक्त आले. डोक्यावर झालेल्या जबर प्रहाराने विजयकुमारची प्राणज्योत मालवली. विजयकुमार निस्चेत झालेला पहाताच राहुल भानावर आला. आपल्या हातून विजयकुमारचा खून झाल्याचे लक्षात येताच त्याला घाम फुटला. त्याने विजयकुमारच्या पँटच्या खिशातील मोबाईल आणि पैसे काढून घेतले आणि घाई-घाईत एका वाहनात बसून तो पनवेलला निघून गेला. राहुल हरजन याचा हा आंखो देखा कबुली जबाब कॅमेऱ्यात कटीबद्ध होताच पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी विजयकुमारच्या खून प्रकरणावर प्रकाश टाकण्याची मोहिम फत्ते झाल्याची बातमी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक विश्वास काळे, उपअधीक्षक ऋषीकेश रेड्डी यांना दिली. त्यांच्या आदेशाने राहुल हरजन याच्या हातात बेड्या ठोकून त्याला धुळे शहर पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले. धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंदराव कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल हरजन याच्याविरोधात भा.दं.वि. कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले. गुन्हा घडल्यापासून २४ तासांत पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक आनंदराव कोकरे, उपनिरीक्षक योगेश राऊत, हेडकॉन्स्टेबल प्रभाकर बैसाणे, श्रीकांत पाटील, कमलेश सुर्यवंशी, योगेश चव्हाण, राहुल सानप, राहुल गिरी, तुषार पारधी, रफिक पठाण, मयुर पाटील, तसेच शहर पोलीस स्टेशनचे कुंदन खरात, गुणवंत पाटील, मच्छिंद्र पाटील आदींनी सुयोग पद्धतीने तपास करून आरोपीला शोधून काढले. त्याला गजाआड केले व गुन्हा उघडकीस आणला, त्याबद्दल पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक विश्वास काळे, उपअधीक्षक ऋषीकेश रेड्डी यांनी उपरोक्त अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

### व्याजाच्या पैशावरून दोघांमधील वाद...

होता. तो ही सराईत गुन्हेगार असल्याने त्या दोघांचे कधीच एकमेकाशी पटत नव्हते. तरी ही ते दोघे दारू प्यायला आणि पार्टी करायला एकत्र येत होते. दोघांना ही गांजा ओढण्याची सवय होती. मागे एकदा ऋषीकेशने त्याला काही रक्कम व्याजाने दिली होती. आठ दहा महिने झाले तरी अथर्व हा काही ऋषीकेशला ते पैसे परत देत नव्हता. दोघे ही सारख्याला वारके असल्याने दोघांच्यात या कारणातून नेहमी मारामारी भांडणे होत होती. अथर्व हा काही घेतलेले पैसे परत देत नसल्याने ऋषीकेश हा त्याचेवर चिडून होता. तो त्याला बघून घेण्याची भाषा करीत होता. अथर्व ही त्याला खुन्नस देत असल्याने तो ही त्याला भीत नव्हता. गेल्या आठ दहा महिन्यात त्या दोघांची बऱ्याचवेळेला भांडणे झाली होती. २ डिसेंबर २०२२ रोजी ही त्या दोघात या कारणातून मारामारी झाली होती. त्यावेळी ऋषीकेशने अथर्व याला चांगलाच दणका दिला होता. दोघांनी ही लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनमध्ये त्यावेळी परस्पर गुन्हा दाखल केला होता तेव्हापासून अथर्व हा ऋषीकेशला टरकूनच होता. ऋषीकेश कधी तरी आपला गेम करणार याची त्याला खात्री झाली होती. तेव्हापासून तो सावध होता. आपल्या जीवाला ऋषीकेश सुर्यवंशीकडून धोका असल्याचे अथर्व याने आपले मित्र गणेश यलगट्टी, ऋषभ साळोखे, सोहम शेळके यांना सांगितली. ते तिघे ही अथर्वचे जवळचे मित्र असल्याने त्यांना ही ऋषीकेश सुर्यवंशीबरोबर अथर्व याचे असलेला वाद माहित होता. त्यामुळे त्यांनी ही अथर्वही मदत करण्याच्या हेतूने ऋषीकेशचा कायमचा काटा काढण्याच्या कामात मदत करण्याचे वचन दिले. आपले तिघे ही मित्र आपल्या बरोबर असल्याने अथर्वची चरबी वाढली होती. ऋषीकेश त्याला खुन्नस देत असला की तो ही त्याला खुन्नस देवू लागला होता. त्या दोघांची भांडणे आता विकोपाला गेली होती. अथर्व आणि त्याच्या मित्रांनी ऋषीकेशचा कसा गेम करायचा याचा विचार केला आणि तसा प्लॅन ही केला. त्याच्या प्लॅनप्रमाणे ऋषभ साळोखे याने दारू पिण्यासाठी बोलाविण्याचे ठरले. गणेश यलगट्टी, ऋषभ साळोखे, सोहम शेळके यांना ऋषीकेश सुर्यवंशी हा ओळखत होता.ते तिघे ही अथर्वची बाजु घेत बोलतात हे ही त्याला माहित होते. गणेश यलगट्टी तर अथर्वच्या बाजूने बोलताना ऋषीकेशला दादागिरी करीत होता. त्यामुळे गणेशवर ही तो चिडून होता. बुधवार दि.१८ रोजी संध्याकाळी ऋषीकेशच्या मोबाईलवर अथर्व हावळ याने फोन करून तु कोठे आहेस मागचा मॅटर आपल्याला संपवायचा आहे असे सांगितले.यावर ऋषीकेश हा न घाबरणारा असल्याने चल कुठे येवू असे विचारले. त्यानंतर त्याने आपली दुचाकी घेतली आणि त्याने बोलविलेल्या ठिकाणी गेला. तेथे अगोदरच गणेश यलगट्टी, सोहम शेळके आणि ऋषभ साळोखे हे अथर्वबरोबर होते. त्यांनतर त्या चौघांनी ही ऋषीकेषला गोड बोलून तुझे पैसे तुला मिळतील पण त्या अगोदर दारूची पार्टी करूया असे सांगितले. तो ही पैसे मिळणार म्हणून दारूच्या पार्टीला तयार झाला. महानगरपालिकेच्या हद्दीत असणाऱ्या जोतिर्लींग शाळेच्या मागील बाजूस ओढयाकडे हे चौघे ही दारूची पार्टी करण्यासाठी गेले. चौघांनीही दारू ग्लास स्नॅकस आणि गांजा बरोबर घेतला होता.रात्रीच्या अंधारात ओढयालगत असणाऱ्या झाडा झुडपाच्या बाजुला ते चौघे ही दारू पित बसले. अथर्व आणि त्याच्या मित्रांनी प्लॅन केलेला होता तसे घडत होते. दारूच्या पेग वर पेग ते चौघे ही रिचवत असताना, त्यांनी गांजा ही ओढयाला सुरूवात केली. त्यामुळे त्यांना नशा व्हायला वेळ लागला नाही. त्यानंतर गणेश याने मुद्दामच एका मुलीचा विषय काढला त्या मुलीवर अथर्व हावळ आणि ऋषीकेश सुर्यवंशी हे दोघे ही लाईन मारत होते. परंतु ती मुलगी त्या दोघांच्या ही हाताला लागत नव्हती. त्यामुळे ऋषीकेशने सावध होत त्या मुलीचा विषय बंद करून पैशाचा विषय काढला व अथर्वला पैशाची विचारणा केली. त्यावर पैसे देतो की काय पळून जातो काय म्हणत परत पेग घ्यायला सुरू केले. चौघांनाही फुल्ल नशा झाली होती. ऋषीकेशला त्यांनी मारण्याचा त्यांनी प्लॅन केला असल्याने मुद्दामच ते पैशाचा विषय टाळत होते. ही गोष्ट ऋषीकेशच्या लक्षात आल्यावर तो त्याच्याबरोबर वाद घालायला सुरूवात केला. त्याने वाद घालायला सुरूवात केल्यावर ते चौघे ही त्याला मारायला पुढे गेले. हे चौघे एक झाल्याचे बघून ऋषीकेशने काय ओळखले. मारायला येणाऱ्या दोघांना बाजुला ढकलून देऊन तेथून तो पळून जावू लागला. त्यावेळी पळून जाणाऱ्या ऋषीकेशवर ऋषभ साळोखे याने कमरेला लावलेला चाकू काढला आणि ऋषीकेशवर सपासप वार केले. त्याचेवर चाकूने हल्ला केल्यानंतर ही तो पळून जावू लागल्याने आणि जीव वाचविणेसाठी धडफडू लागल्यावर त्याला परत खाली पाडले. त्यावेळी सोहम शेळके आणि अथर्व हावळ यांनी खाली पडलेल्या ऋषीकेशचे हातपाय दाबून धरले. त्यानंतर गणेश यलगट्टी याने बाजुलाच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि ऋषीकेशच्या डोक्यात घातला.तरी ही ऋषीकेशची हालचाल होत असल्याने त्याने दगड परत उचलला आणि सात ते आठ वेळा त्याच्या डोक्यात हाणला. त्याच्या शरीराची हालचाल बंद झाल्यावर ही त्याने तो दगड त्याच्या डोक्यात घातला. त्यामुळे ऋषीकेशचे डोके आणि चेहरा पुर्ण रक्ताने माखला गेला होता. तरी ही तो मरत नाही म्हणून त्या चौघांनी परत त्याच्या छातीवर, पोटावर आणि मानेवर चाकूने वार केले. त्यावेळी त्याची हालचाल मंदावली. काही वेळातच तो गतप्राण झाला. त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे बघून त्या चौघांनी ही तेथून आपली बाईक घेऊन पळून जावू लागले.पर इतक्यात त्याच्या लक्षात आले की मयत ऋषीकेशची दुचाकी आणि मोबाईल तेथेच आहे ते पोलीसांच्या हाती लागले तर आपण पकडले जावू म्हणून त्यांनी त्याची दुचाकी आणि मोबाईल घेऊन तेथून पोबारा केला. दुसऱ्या दिवशी सकाळी ही घटना उघडकीस आली. पोलीसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली असता पोलीसांना घटनास्थळी मयत तरूणाचा छिन्नविच्छिन्न झालेला मृतदेह ओढयाच्या लगत झाडाझुडपात दिसून आला. घटनास्थळी दारूच्या बाटल्या स्नॅक्स, आणि गांजाच्या पुढया ही आढळून आल्या होत्या. घटनास्थळी वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यासह करवीर पोलीस स्टेशनचे पोलीस ही हजर झाले होते. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती मयत ऋषीकेशची आई माधवी सुर्यवंशी यांनी करवीर पोलीसांना देवून आपल्या मुलग्याच्या खूनातील संशयीत आरोपीची नावे पोलीसांना सांगितली. परंतु त्यांनी सांगितलेल्या नावापैकीदोघे आरोपी पैकी शुभम शेटी हा कंळबा जेलमधून नुकताच जामीनावर बाहेर आला होता. तर अक्षय खटांगळे हा अद्यापही कळंबा जेलमध्येच आहे याची माहिती पोलीसांना मिळाली होती. त्यांनीच ऋषीकेशच्या खूनाची सुपारी दिली आहे का? याचा तपास पोलीस करीत असताना त्याचा या घटनेशी कोणताच संबंध नसल्याची माहिती मिळाली.पोलीस या घटनेचा दुसऱ्या बाजूने तपास करीत होते. घटनेच्या दिवशी मयत ऋषीकेशच्या मोबाईलवर अथर्व हावळचा फोन आल्याची माहिती पोलीसांना मिळाली या घटनेत त्याचसह इतर तिघांचा सहभाग असल्याची ही माहिती पोलीसांना मिळाली. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेशचे पोलीस ही करीत होते. त्यांना संशयीत आरोपी हे नाळे कॉलनीत लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यांना मिळालेल्या माहितीनुसार नाळे कॉलनीत पोलीसांनी लपून बसलेल्या ठिकाणी धाड टाकली.त्यांना ताब्यात घेऊन करवीर पोलीस स्टेशनला आणले.ऋषीकेश सुर्यवंशी याच्या खूनात आपला मुलगा अथर्व हावळ याची आई शिल्पा संजय हावळ (वय ४०) हिने विषारी औषध घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तिला सीपीआर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी अथर्व संजय हावळ(वय २०) रा.कुंभार गल्ली, शाहू उद्यान, कोल्हापूर, गणेश लिंगाप्पा यलगट्टी (वय २०) रा.गिरगाव रोड पाचगाव, ऋषभ विजय साळोखे (वय २१) रा.रामानंद नगर, सोहम संजय शेळके (वय २०) रा.गजानन महाराजनगर कोल्हापुर याचेकडे पोलीसांनी चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का?आरि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.त्यांनी गुन्हा कबुल केल्यानंतर मयत ऋषीकेश सर्युवंशी याची आई माधवी सुर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी ऋषीकेश ऊर्फ संभा महादेव सुर्यवंशी (वय २४) रा. चंबुखडी शिंगणापुर याच्या खून प्रकरणी या चौघांच्या विरोधात खून मारामारीसह गुन्हे दाखल करण्यात आले. त्यांना शनिवारी मा. कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू, त्याचे रक्ताने माखलेला कपडे व तीन मोटार सायकली जप्त केल्या. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषणचे सहा.पोलीस निरी.शिवानंद कुंभार, विक्रम चव्हाण याच्या बरोबर करवीर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. आर्थिक कारण आणि पुर्ववैमन्यस्य ही खुन करण्याला दोन कारणे कारणीभूत ठरत असतात हेच या घटनेवरून दिसून येते.

# जळगावमध्ये वाळू तस्करीला विरोध करणाऱ्याची वाळूमाफियांनी ट्रॅक्टरने चिरडून केली हत्या

**जळगाव/क्राईम रिपोर्टर**

महसुल प्रशासनाच्या आशिर्वादाने राज्यात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात वाळू माफियांची मुजोरी वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही ठिकाणी तर वाळू माफीया, वाळू चोरटे महसुल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अंगावर ट्रॅक्टर नेण्यास देखील भीत नाही. पकडून नेलेले वाळूने भरलेले ट्रॅक्टर अथवा डंपर पळवून नेल्याच्या देखील घटना बघण्यास मिळतात. एकूनच वाळू माफीया मुजोर झाल्याचे जनता उघड्या डोळ्यांनी बघत आहे. वाळूने भरलेल्या भरधाव ट्रॅक्टरखाली पादचारी चिरडले जाण्याच्या घटना देखील जनतेला नवीन नाही. जळगाव जिल्ह्याच्या अमळनेर तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीस मज्जाव करणाऱ्या तरुणाचा खून झाल्याच्या घटनेने जळगाव जिल्हा हादरला आहे. अमळनेर तालुक्यातील मांडळ येथे १७ जानेवारी रोजी एका तरुणाच्या अंगावर ट्रॅक्टर चालवून त्याचा खून केल्याची घटना घडल्याने अमळनेर तालुका हादरला असून नातेवाईकांनी महसुल व पोलीस प्रशासनावर ताशेरे ओढत या खूनाला जबाबदार असलेल्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना अटक करा व मृत तरुणाच्या कुटुंबियांना न्याय द्या, या मागणीने थेट मृतदेह तहसील आवारात आणत प्रशासनाला धारेवर धरले. दरम्यान जोपर्यंत आरोपींना अटक केली जात नाही, तोपर्यंत मृतदेह तहसील आवारातून हलविणार नाहीत, असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव यांच्यासह अधिकाऱ्यांनी ठोस कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर तब्बल एका तासाने अंत्यविधीसाठी मृतदेह मांडळ येथे नेण्यात आला.







मांडळ येथील जयवंत यशवंत कोळी (३६) हा तरुण लौकी नाला परिसरात शेतात पाणी भरण्यासाठी गेला होता. सकाळी त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर गेल्याने ते जबर जखमी झाल्याची माहिती गावातील शेतकरी धनराज उर्फ पिंटू झिपरू पाटील आणि हेबत गजमल पाटील यांनी दिल्यानंतर जयवंत कोळी यांना नातेवाईक व ग्रामस्थांनी तात्काळ स्थानिक डॉक्टरांकडे उपचारासाठी नेले. त्यानंतर जयवंत कोळी यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तात्काळ धुळे येथे उपचारासाठी हलवले. मात्र काही वेळेतच त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान मृत जयवंतची पत्नी शुभांगी कोळी यांच्या फिर्यादीवरून मारवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ रोजी रात्री ९ वाजता अशोक लखा कोळी हा मोटार सायकलसह रस्त्यावर थांबून होता. विशाल अशोक कोळी, सागर अशोक कोळी, विनोद अशोक कोळी, रोहन बुधा पारथी, पिटु शिरपुरकर असे सर्वजण नाल्यातून ट्रॅक्टरमधे रेती भरत होते. त्यावेळी जयवंत कोळी यांनी अशोक लखा कोळी यांना सांगितले की, तुम्ही रात्रीच्या वेळी वाळू भरत जावू नका, तुमच्या वाळू वाहतुकीमुळे रस्तादेखील खराब झाला आहे, या रस्त्याने तुमची वहीवाट नाही असे बोलून त्याचे अर्धवट भरलेले ट्रॅक्टर जयवंत याने परत पाठवले होते. त्याचा राग मनात धरून त्या दिवसापासून अशोक लखा कोळी हा जयवंत कोळी याच्याकडे सुड बुद्धीने बघत होता. प्रथमदर्शनी अपघात की खून याबाबत शंका उपस्थित केली जात होती, मात्र घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव आणि मारवड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जयेश खलाणे यांनी प्रत्यक्ष भेट देत पाहणी केली. तसेच फॉरेन्सिक व श्वानपथकाच्या पाहणीनुसार संबंधित तरुणाचा खूनच झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार मारवड पोलिसात सुमोर सहा जणांवर कलम ३०२,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. महसुल प्रशासनाचा नाकर्तेपणा तालुक्यात महसूल प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे ही घटना घडली आहे.

अवैध वाळू वाहतुकीवर कोणाचा वरदहस्त आहे? असाही संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कुंभकर्णी झोप घेणाऱ्या महसूल प्रशासनाचा हा कानाडोळा असल्याने अवैध वाळू वाहतुकीला लगाम नसून त्यामुळेच मुजोरी वाढत खूनासारखे प्रकार तालुक्यात घडत आहेत त्यामुळे पाणी कुठे मुरत आहे, अशा चर्चांना या घटनेमुळे उधाण आले आहे. दरम्यान अवैध वाळू वाहतुकीच्या घटना दिवसेंदिवस घडू लागल्याने महसूल प्रशासनाने ठोस पाऊल उचलणे गरजेचे आहे. मात्र, एक डोळा उघडा आणि एक डोळा झाकलेला अशी गत महसुल प्रशासनाची दिसून येत आहे. एखाद कारवाई करत 'काखेत कळसा अन् गावाला वळसा' या म्हणीला चालना मिळत आहे. शिवाय मातब्बर वाळू माफियांना अभय दिले जात असल्यामुळे असे प्रकार घडू लागल्याने जयवंत कोळी सारखे अनेक तरुण प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचे भविष्यात अजून बळी ठरतील, यात शंका नाही. त्यामुळे महसुल वा पोलीस प्रशासनाने वेळीच गंभीर दखल घेत जनमानसाचा विचार करत असले प्रकार भविष्यात घडू नयेत, म्हणून तात्काळ दखल घ्यावी, अशीही अपेक्षा जनमानसातून होत आहे. १६ रोजी रात्री ९ ते १७ रोजी सकाळी ७.३० वाजेदरम्यान जयवंत कोळी हे शेतात एकटे असतांना त्यांना संगनमताने फावड्याने मारहाण करून त्यांच्या गुप्तभागावर इजा पोहचवली व दुखापत करून त्यानंतर त्यांच्या अंगावरून ट्रॅक्टर नेवून त्यांना जिवेठार केले आहे. अशी तक्रार मयत जयवंत कोळी यांच्या पत्नी शुभांगी कोळी यांनी अशोक लखा कोळी, विशाल अशोक कोळी, सागर अशोक कोळी, विनोद अशोक कोळी, रोहन बुधा पारथी, पिंटू शिरपूरकर (पूर्ण नाव माहित नाही) सर्व राहणार मांडळ या सहा जणांविरुद्ध मारवड पोलिसात दिली आहे. या घटनेने तालुक्यासह जिल्हा हादरला असून वाळू माफियांची दिवसेंदिवस मुजोरी चाढत चालल्याने त्यांचा विरुद्ध कठोर पाऊले पोलिसांनी उचलावे अशीही संतप्त भावना यावेळी सुज्ञ नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासन याबाबत काय कठोर निर्णय घेतात याकडे तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मृत जयवंत कोळी यांच्यावर त्यांच्या गावी उशिरा अंत्यविधी करण्यात जाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले, आई, वडील असा परिवार आहे. या घटनेने अमळनेर तालुका हादरला असून समाज मन सुन्न झाले आहे. पत्नीचा आक्रोश मन हेलावणारा जयवंत कोळी हा तरुण अवैध वाळू वाहतुकीचा बळी ठरला, मात्र त्याचे कुटुंब पोरके झाल्याने यावेळी जयवंत कोळी यांच्या पत्नीचा आक्रोश मनाला हेलावणारा होता. मृत जयवंत कोळी यांचे प्रेत तहसील कार्यालयात आणल्यावर त्यांची पत्नी शुभांगी कोळी यांनी रुग्णवाहिका मधील जयवंत काळी यांच्या शवाकडे पाहत एकच आक्रोश केला होता. यावेळी शुभांगी कोळी आपल्या मृत पतीच्या देहाकडे पाहून आपल्या दोन लहान लेकरांकडे कोण पाहिल. त्यांना बापाचे प्रेम कोण देईल अशी आर्त हाक करीत तुमच्या सोबतीला शेतातील प्रत्येक काम मी तुमच्या खांद्याला खांदा लावून करत होती, आता मला तुमची सोबत नाही, मी कसं जगू असा टाहो शुभांगी कोळी यांनी फोडला होता एकंदरीत तिचा आक्रोश पाहून प्रत्यक्षदर्शी लोकांचेही डोळे पाणावले. माझ्या पतींचा खून करणाऱ्या मारेकऱ्यांना अटक करा, त्यांच्यावर तात्काळ कारवाई करा असे म्हणत जयवंत कोळी यांचे प्रेत धुळ्याहून शवविछेदन केल्यानंतर थेट तहसील कार्यालयात आणले होते. जोपर्यंत सर्व गुन्हेगार यांना अटक होत नाही, तोपर्यंत प्रेत ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली. मात्र कायदा व सुव्यवस्था राखत पोलीस अधिक्षक एम. राजकुमार, अतिरिक्त पोलीस अधिक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाने उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव, पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांनी संबंधित नातेवाईकांना समज देत मुन्हेगारांना अटक करून कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिल्यानंतर तब्बल एक तासानंतर प्रेत ताब्यात घेण्यात आले.

## भिवंडीत रिकाम्या पाण्याच्या बाटली वरून पोलिसांनी ९९ लाखांची घरफोडी करणाऱ्या आरोपीला ठोकल्या बेड्या

**भिवंडी/अभिजित हिरे**



शहरा लगतच्या खोणी ग्रामपंचायत हद्दीतील एका गोदामात आठ जानेवारी रोजी झालेल्या एका चोरीच्या घटनेचा कसोशीने तपास करीत असताना निजामपुरा पोलिसांनी घटनास्थळावर आढळून आलेली रिकामी पाण्याची बाटली व चिप्स पॉकेट्सचे रॅपर यावरून चोरट्याचा माग काढून त्यास जेरबंद करीत त्याच्या जवळून चोरीस गेलेला ९९ लाख ३९ हजार २६० रुपये किमतीचा गारमेंट कपडा व पाच हजार रुपये किमतीचा सीसीटीव्ही डीव्हीआर असा मुद्देमाल जप्त केला आहे. परशुराम सरवदे असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. निजामपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मिठपाडा खोणी येथे ऍंडोन एक्सपोर्ट नावाच्या कंपनीचे गोदाम असून त्या ठिकाणी वेगवेगळ्या कंपनीचे शर्ट, पॅन्ट, टीशर्ट, पडद्याचा कपडा, पॅन्टच्या पॉकेटला लावण्यात येणार कपडा, सलवार सुटचा कपडा व तयार सलवार सूट चा कपडा ठेवलेला होता. त्या गोदामाच्या शटरचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने तेथील माल चोरी केल्याच्या गुन्ह्याचा तपास करताना घटनास्थळा वर रिकामी पाण्याची बाटली व वेफर्सची रिकामे रॅपर आढळून आले. आरोपीने चोरी करीत असताना तेथील सीसीटीव्हीचा डीव्हीआर सुद्धा चोरी केलेला असल्यामुळे त्याबाबतचा कोणताही पुरावा चोरट्याने मागे ठेवलेला नव्हता. पोलीस पथकाने पाण्याची रिकामी बाटली व वेफर्स रिकामे रॅपर परिसरातील कोणत्या दुकानातून खरेदी केलेले आहे या बाबतची माहिती घेण्यास सुरुवात केली. त्यामध्ये एका हॉटेलमधली ही बाटली असल्याचे समजले तेथील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्या फुटेजमध्ये रेकॉर्ड वरील सराईक गुन्हेगार परशुराम सरवदे हा पाण्याची बाटली खरेदी करताना आढळून आला. त्यानंतर पोलीस पथकाने घटनास्थळा वरील डमडाट्या वरून संशयित आरोपी परशुराम सरोदे यांचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्याचा तांत्रिक तपास करीत आरोपी हा अंजुरफाटा साठे नगर या ठिकाणी असल्याची माहिती निष्पन्न झाल्यानंतर पोलीस पथकाने त्यास सापळा रचून अटक केली आहे.आरोपी परशुराम सरवदे याने आपल्या इतर तीन ते चार साथीदारांसह ही चोरी केल्याचे कबूल केले असून त्याच्या ताब्यात असलेला सर्वच्या सर्व मुद्देमाला हस्तगत करण्यात निजामपूरा पोलिसांनी यश मिळवले आहे.

## राजमाता जिजाऊ स्वराज्य निर्मितीच्या प्रणेत्या-सीईओ मनीषा आव्हाळे

### मराठा सेवा संघ झेडपी शाखेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



राजमाता जिजाऊ या स्वराज्य निर्मितीच्या प्रणेत्या होत्या, त्यांच्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले, त्यांचा आदर्श सर्व युवती महिलांनी घ्यावा, असे मत सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी मांडले. जिल्हा परिषद मराठा सेवा संघ शाखेतर्फे राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये आयोजित कर्तृत्वमान महिलांच्या सन्मानप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय जावीर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, कार्यकारी अभियंता दीपक कोळी, संतोष कुलकर्णी, डॉ. नवनाथ नरळे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील समन्वयक माऊली पवार आदी उपस्थित होते. प्रारंभी जिल्हा परिषद मराठा सेवा संघ शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर वीज क्षेत्रात सन्मान केलेल्या कर्तुत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे निवासी उपजिल्हाधिकारी क्षमा पवार, किड्स स्कूलच्या स्नेहा पाटील प्रयोगशाळा वैज्ञानिक फेजीया मुजावर अधिपरिचारिका आशा पाटील, पत्रकार प्रमिला चोरगी, अश्विनी तडळवळर, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सीईओ मनीषा आव्हाळे व निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना राजमाता जिजाऊ या स्वराज्य निर्मितीच्या प्रणेत्या होत्या, त्यांच्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले, त्यांचा आदर्श सर्व युवती, महिलांनी घ्यावा असे आवाहन केले. सूत्रसंचालन सरस्वती पवार यांनी केले. कार्यक्रमास कास्ट्राईब संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण क्षीरसागर, राजेश देशपांडे, दिनेश बनसोडे, गिरीश जाधव, कर्मचारी युनियनचे अध्यक्ष तजमूल मुतवल्ली, दिव्यांग संघटनेचे लक्ष्मण वंजारी, कंत्राटी कर्मचारी महासंघाचे सचिन जाधव, जुनी पेन्शन संघटनेचे अध्यक्ष रामचंद्र शिंदे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अनिरुद्ध पवार व विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चेतन भोसले, विकास भांगे, वासुदेव घाडगे, अभिजीत निचळ, आप्पासाहेब भोसले, सचिन पवार, सचिन साळुंखे, सचिन चव्हाण, राम जगदाळे, विशाल घोगरे, गणेश साळुंखे, विकास भांगे, सूर्यकांत मोहिते, नितीन पाटील, विष्णू पाटील, सुधाकर मानेदेशमुख, अविनाश भोसले, हरिभाऊ देशमुख, प्रशांत लंबे, अजय चव्हाण, उमेश खंडागळे, जयंत पाटील, सोनाली कदम, अश्विनी सातपुते, सविता मिसाळ, प्रतिक्षा गोडसे, राहुल शिंदे, विष्णू पाटील, ऋषिकेश जाधव, अनुपमा पडवळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मराठा सेवा संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित रक्तदान शिबिराला जोरदार प्रतिसाद मिळाला. तसेच आरोग्य तपासणी शिबिरात १२५ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. यासाठी डॉ. बी.के. खजूरगी,एस. बी. नदाफ यांनी परिश्रम घेतले. तसेच जिजाऊ माँसाहेब यांची दूरदृष्टी' या विषयावर प्रतीक्षा लामकाने, सानिका शिंदे, सांस्कृती गुरव, सानिका लामकाने यांचे व्याख्यान झाले.

## देवणीत दोन किलो गांजा जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**देवणी** : शहरात अवैधरीत्या गांजा विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलिसांनी बुधवारी सायंकाळी अचानक छापा टाकला. त्यात दोन किलो गांजा व एक दुचाकी जप्त करण्यात आली. त्याची किंमत १ लाख ७० हजार रुपये आहे. याप्रकरणी दोघांविरुद्ध देवणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, देवणी शहरात अवैधरीत्या गांजा विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी बुधवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अचानक छापा टाकला. तेव्हा दोन किलो गांजा आढळला. त्याची किंमत ७० हजार रुपये आहे. तसेच एक दुचाकी जप्त करण्यात आली. एकूण किंमत एक लाख ७० हजार रुपये आहे. याप्रकरणी रंजना सुधाकर कांबळे सत्यम सुधाकर कांबळे यांच्याविरुद्ध देवणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी महिला आरोपीस अटक केली असून दुसरा आरोपी फरार झाला आहे. ही कारवाई येथील पोलिस निरीक्षक गणेश सोंडारे, सहायक पोलिस उपनिरीक्षक कोंडामंगले, पोलिस हेड कॉन्स्टेबल विनायक कांबळे, गणेश बुजारे, आगलावे, कीर्तीताई बनाले यांनी केली.

## ठाकरे गटाच्या देवणी तालुका प्रमुख पदी मुकेश सुडे तर शहरप्रमुख पदी दीपक मळभगे

**देवणी/प्रतिनिधी**





उध्दव ठाकरे गटाच्या देवणी तालुका प्रमुख पदी मुकेश सुडे तर शहरप्रमुख पदी दिपक मळभगे यांची निवड खासदार चंद्रकांत खैरे यांच्या मार्गर्शनाखाली, जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी ही निवड केली. या निवडी बद्दल मुकेश सुडे व दिपक मळभगे यांनी मध्यमाशी बोलताना म्हणाले की आमची निवड करून पक्षाने दाखवलेला विश्वास निश्चित पणे पक्षवाडी साठी पूरक कामे करून पक्ष मजबुत कसा होईल यासाठी आम्ही दोघे प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. वरील दोघांच्या निवडी बद्दल लक्ष्मण बिरादार, गणपत पाटील, शीवभाऊ कांबळे, कृष्णा कांबळे, संजय बिरादार, माधव मोरे, अरुण पाटील, विशाल बावरे, रंजीत दोडके, सचिन बिरादार, संताजी पाटील, कृष्णा इंगोले, दत्ता बिरादार, बन महाराज, शेषराव कासले आदिनी अभिनंदन केले आहेत.

## महाराष्ट्र स्टेट कॅरम स्पर्धेत दुर्गेश्वरी धोंगडे विजयी

**जळगाव/प्रतिनिधी**



५६व्या सब-ज्युनिअर आणि ज्युनिअर महाराष्ट्र राज्य कॅरम चॅम्पियनशीप स्पर्धा २०२२-२३ मुंबई-दादर येथील श्री हलारी ओसवाल समाज हॉल येथे दि. ११ जानेवारी २०२३ ला पार पडली. या स्पर्धेत जैन स्पोर्टस् ॲकडमीची खेळाडू कु. दुर्गेश्वरी योगेश धोंगडे विजयी झाली. तिने रत्नागरीच्या निधी सप्रे हिचा ४-२५ व ५-२५ ने पराभव केला. दुर्गेश्वरी धोंगडे हिने कॅडेट ग्रुप १२ वयोगटामध्ये पहिला क्रमांक प्राप्त केला. महाराष्ट्रातून प्रथम आल्याने दुर्गेश्वरीचा चषक, प्रमाणपत्र ऑल इंडिया कॅरम फेडरेशनचे अरूण केदार यांच्याहस्ते गौरविण्यात आले. या यशानंतर तिची राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली असून राष्ट्रीय कॅरम स्पर्धा वाराणसी येथे खेळविली जाणार आहे. दुर्गेश्वरी धोंगडे हिला प्रशिक्षक म्हणून जैन स्पोर्टस कडमीतील प्रशिक्षक सय्यद मोहसीन व योगेश धोंगडे यांनी मार्गदर्शन केले. तिच्या यशाबद्दल जैन स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष अतुल जैन, प्रशासकीय अधिकारी अरविंद देशपांडे यांच्यासह सहकाऱ्यांनी कौतूक केले.


**FORM N.D.**
**[See rule 92 (3)]**

Form of Notice to be published in Newspaper by the successor to the Permit holder.

It is hereby informed for the knowledge of public that **Shir Yashwant N. Wavade** owner of the Mototr Vehicle No. **MH 48 N 2349** covered by Permit No. **MH48/179B2014** has expired on 24/10/2022.

I ~~Shri~~./Smt. **Anita Yashwant Wavade** Address At. **D/23, virar Ashirwad co.op. Hsg. Soc., ltd. ram mandir road, near old MGM School M.B. Estate Virar (west), Thane.** being the successor to the above mentioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority/Regional Transport Office/ Re- gional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this notice, being such fact to the notice of Regional Transport Office/Regional Transport Authority by RTO Vasai.

Name of the Successor
Smt. **Anita Yashwant Wavade**
Address At. **D/23, virar Ashirwad co.op. Hsg. Soc., ltd. ram mandir road, near old mgm school M.B. Estate Virar (west), tal. vasai, Dist. palghar**

23 To 29 JANUARY 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/21/2023 8:14 PM Page 1



# धर्मांतर का करू नये?

कोणताही धर्म माणसाला चांगली शिकवण देतो. अहिंसा, बंधुभाव, माणुसकी, सत्य, परोपकार या सगळ्या धर्माच्या शिकवणी आहेत. आणि भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये हेच तर सांगितलेले आहे. हिंदू धर्मा पुरते बोलायचे झाल्यास काही उच्चवर्णियांनी स्वतःच्या फायद्यासाठी धर्माचा चुकीचा पण आपल्याला हवा तसा अर्थ लावला. त्यामुळे हिंदूंमध्ये जाती धर्माच्या भिंती उभ्या राहिल्या आणि हिंदू समाज विभागला गेला. मनू स्मृतीमुळे हिंदू धर्मात जे ४ वर्ण निर्माण झाले त्यातील सर्वात खालच्या वर्गावर भयंकर अन्याय अत्याचार झाले. त्यांना त्यांच्या सवलीचीही मुभा नव्हती. पेशव्यांनी तर त्यांच्या गळ्यात मडके आणि पाठीला झाडू बांधली. त्यामुळेच अन्यायाच्या विरोधात पेटून उठलेल्या ५०० महार सैनिकांनी पेशव्यांच्या विरोधात ब्रिटिशांना साथ दिली आणि त्यांचे २८ हजार सैनिक कापून काढले. हा भीमा कोरेगावचा इतिहास आहे. जे तिथल्या शौर्यस्तंभाला विरोध करीत आहेत. त्यांनी हा विषय समजून घ्यावा. जर हिंदू असूनही ते केवळ खालच्या वर्गातील आहेत म्हणून त्यांना पशुपेक्षा सुद्धा वाईट वागणूक दिली जात असेल तर त्यांनी धर्मांतर का करू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही हिंदू समाजातील याच अनिष्ट रूढी परंपरा विरोधात आवाज उठवून अखेर धर्मातर केले. जर एखाद्या माणसाचे घर मोडके असेल आणि तिथे राहण्यात त्याच्या जीवाला धोका असेल अशावेळी एकतर तो ते घर रीपेरींग करतो किंवा त्या घराचा कायमस्वरूपी त्याग करतो. बाबासाहेंबांनी तेच केले आणि आपल्या लाखो अनुयायांसह धर्मातर केले. धर्मातराची आवश्यकता लक्षात घेऊनच बाबासाहेबांनी घटनेत कुठेही धर्मातराला विरोध करणारा कायदा केला नाही. जर एखाद्याची त्याच्या धर्मात कोंडी होत असेल त्याच्या विकासाच्या आड धर्म येत असेल किंवा धर्मामुळे त्याची सुरक्षा धोक्यात येत असेल तर त्यांनी धर्मातर करायलाच हवे. फक्त धर्मातर जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून केले जाऊ नये. पण धर्मातर हे घटनेने वैध ठरवलेले आहे. त्यामुळे देशातील प्रत्येकाला त्याच्या स्वेच्छेने धर्मातराचा पूर्ण अधिकार आहे. पण आजकाल काही कट्टरपंथी लोक धर्मातराला विरोध करीत आहेत. त्यांचा हा विरोध चुकीचा आहे. जर तुम्ही तुमच्या धर्मात त्याला तूच्छतेची वागणूक देत असाल त्याला गुलाम बनवून जगण्यास मजबूर करीत असाल त्याच्या न्याय अधिकारावर गदा आणणारा असाल तर त्याने धर्मातर का करू नये? त्यांनी कुठल्या धर्मात राहावे? कसे जगावे हे सांगणारे तुम्ही कोण? आज प्रत्येक धर्मातील माणूस सुशिक्षित आहे. त्याला आपले बरे वाईट कळते. त्यामुळे कुठल्याही धर्मातील जुनाट आणि घटनाबाह्य रूढी परंपरा त्याला मान्य नाहीत. आणि विज्ञान युगातला आजचा तरुण धर्म आणि जात पात यांना फारसे महत्व देत नाही. कारण माणसाच्या दैनंदिनी गरजांशी धर्म आणि जातीचा काहीही संबंध नाही. एखादा माणूस दुकानावर काही खरेदी करायला गेला तर दुकानदार त्याची जात किंवा धर्म विचारात नाही. तर त्याच्याकडे असलेली वस्तू घेण्या येवढे त्याच्याकडे पैसे आहेत का? एवढेच बघतो. त्याच बरोबर एखाद्या हॉटेलात माणूस चहा प्यायला जातो तेंव्हा त्याला ज्या कपात चहा दिली जाते त्याच कपात अगोदर कुणीतरी दुसऱ्या जातीचा माणूस चहा पिवून गेलेला असतो. त्यामुळे या कपात अगोदर कोण चहा पीवून गेला याची तो चौकशी करीत नाही. देशाचे जे चलन आहे ते रोज अनेक जाती धर्माच्या लोकांच्या हातातून एकमेकांना दिले जाते, तिथे शिवाशिव किंवा स्पृश्य/अस्पृश्यता कुणी पाहत नाही. थोडक्यात माणसाच्या रोजच्या दिनचर्येत धर्माचा काडीचाही संबंध येत नाही. शिकल्या सावरलेल्या लोकांनी याच गोष्टीचा विचार करायला हवा. मिशनरी लोक गरीब हिंदूंचे धर्मातर करतात हे जरी खरे असले तरी लोक धर्मातराला का तयार होतात याचाही विचार करायला हवा. आज ग्रामीण भागात असे कितीतरी गाव आहेत जिथे विज, पाणी, रस्ते यासारख्या प्रार्थमिक सुविधा नाहीत. ठाणे पालघर सारख्या आदिवासी जिल्ह्यांमध्ये रोजगार नाहीत. आदिवासी पाड्यांवर राहणाऱ्या लोकांच्या हाताला काम नाही. प्राथमिक सुविधा नाही. काही ठिकाणी दोन वेळचे सोडा एकवेळचे जेवणही आदिवासी लोकांना मिळत नाही. या लोकांसाठी तिथल्या उच्च वर्णीय लोकांनी आजवर काय केले ते सांगावे. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली, या ७५ वर्षात ग्राम पंचायती पासून संसदेपर्यंत सर्व ठिकाणी शासन प्रशासनाची सर्व सूत्र हिंदू कडेच आहेत, मग या दलीत आदिवासींची अजून स्थिती तशीच का? आणि केवळ हिंदू म्हणून त्यांनी आयुष्यभर तसेच गरिबी आणि लाचारीच्या दलदलीत पडून राहायचे का? जर धर्मातर करून त्यांचा विकास होणार असेल त्यांना सन्मानाने जगण्याचे साधन मिळत असेल तर त्यांनी धर्मातर का करू नये? आणि आता तर आणखी भयंकर परिस्थिती निर्माण होणार आहे. कारण काही कट्टरपंथी मनुवाद, सनातनी धर्माचे अनुकरण करण्याबाबत लोकांना आग्रह करीत आहेत, त्यातून काही भोंदूबाबा शिरजोर होत आहेत, त्यांना बळ मिळत आहे आणि याच बळाच्या आधारावर ते समाजात अंधश्रद्धा पसरवत आहेत. महाराष्ट्र सारख्या राज्यात अंधश्रद्धा विरोधी कायदा असतानाही जाती धर्माच्या प्रभावाखाली वावरणारे सरकार मधील राजकीय पुढारी आणि प्रशासनातील बडे अधिकारी मग गिळून आहेत भोंदू बाबांच्या दुष्कृत्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे देशात अध्यात्मिक बाबांचे पीक आले आहेत. सध्या बागेश्वर बाला नावाचा अशाच एका बाबाला प्रमोट केले जात आहे. सर्व चॅनलवर या बाबाचा महिमा दाखवला जात आहे आणि हे सगळ वेल प्लॅन सुरू आहे. मात्र हिंदू समाजातील एका मोठ्या आणि सुशिक्षित वर्गाचा अशा अंधश्रध्देला विरोध आहे, मग अशा लोकांच्या मनात नाईलाजाने धर्मातराचा विचार आला तर त्याला फासावर लटकवणार का? या सर्व गोष्टींचा देशातील सर्वच जाती धर्माच्या लोकांनी विचार करायला हवा!

# कोर्टात तारीख पे तारीख का होते?

तारीख पे तारीख, तारीख पे तारीख हा चित्रपटातील प्रसिद्ध डायलॉग, नेहमीच सत्य परिस्थितीची जाणीव करून देतो. आजही देशात अनेक खटले प्रलंबित आहेत, प्रकरण कोर्टात पोहोचले म्हणजे काही वर्षे तरी निकाल लागण्यास, न्याय मिळण्यास सहज जातील हे गृहीतच धरले जाते. ही प्रकरणे तात्कळत राहण्यामागची नेमकी कारणे काय आहेत ते आपण लेखातून जाणून घेऊयात.



उत्तर प्रदेशातल्या लखमीपूर खीरी या ठिकाणी झालेल्या हिंसाचाराच्या घटनेची सुनावणी पूर्ण होण्यास कमीत पाच वर्षांचा कालावधी लागू शकतो. हा कालावधी फक्त सत्र न्यायलायतला आहे. त्यानंतर हे प्रकरण हायकोर्टात आणि त्यानंतर सुप्रीम कोर्टात जाऊ शकते. सत्र न्यायालयाने या प्रकरणात सुप्रीम कोर्टात एक अहवाल सादर केला आहे. या अहवालात असे म्हटले आहे की या प्रकरणात २०० साक्षीदार, १७१ दस्तावेज आणि २७ फॉरेन्सिक रिपोर्ट आहेत. त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होण्यास पाच वर्षांचा कालावधी लागू शकतो. लखीमपूर खीरी हिंसाचार प्रकरणात आशिष मिश्रा हा मुख्य आरोपी आहे. आशिष मिश्रा हा केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांचा मुलगा आहे. उत्तर प्रदेश पोलिसांच्या एफआयआरनुसार एका एसयुव्हीने चार शेतकऱ्यांना चिरडले होते. त्या एसयुव्हीमध्ये आशिष मिश्रा बसले होते. तिकुनिया गावात झालेल्या या घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला. यापैकी चारजण हे शेतकरी होते. आशिष मिश्रांशिवाय या प्रकरणात १२ आणखी आरोपीही आहेत.

**दिशायन**

या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागण्यास, पाच वर्षांचा अवधी तर कमीत कमी लागू शकतो कारण सत्र न्यायालयानेच तसं आपल्या सुप्रीम कोर्टात दिलेल्या अहवालात नमूद केलं आहे. सत्र न्यायालयात जर पाच वर्षात काही निर्णय लागला तर पुढे आरोपींना उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायलयात जाण्याचाही पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागण्यास किती अवधी लागेल हे आत्ता सांगता येणं अवघडच आहे.

**देशभरात ५ कोटींपेक्षा जास्त खटले प्रलंबित!**

भारतात पाच कोटींपेक्षा जास्त खटले प्रलंबित आहेत. नॅशनल ज्युडिशियल डेटा ग्रिड अर्थात छगाऊच्या माहितीनुसार देशभरातल्या विविध न्यायलयांमध्ये पाच कोटींपेक्षा जास्त खटले प्रलंबित आहेत. यापैकी साडेचार कोटींहून अधिक खटले हे जिल्हा आणि तालुका न्यायलयांमध्ये प्रलंबित आहेत. तर २५ हायकोर्टांमध्ये ५९ लाखांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयात ७० हजार खटले प्रलंबित आहेत.

**कधीपासून प्रलंबित आहेत खटले?**

नॅशनल ज्युडिशियल डेटा ग्रिडच्या माहितीनुसार कोलकाता हायकोर्टातला एक खटला १९५१ पासून प्रलंबित आहे. याचाच अर्थ ७२ वर्षांपासून या प्रकरणाचा निकाल लागलेला नाही.१३ जानेवारी पर्यंत देशभरातल्या २५ हायकोर्टामध्ये ५९ लाखांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. यामधले ४२ लाखांपेक्षा जास्त हे दिवाणी खटले आहेत तर १६ लाखांपेक्षा जास्त असलेले हे फौजदारी खटले आहेत. याच डेटा ग्रिडच्या माहितीनुसार १० लाख खटले असे आहेत जे एका वर्षात आले आहेत. तर सुमारे ९ लाख खटले एक ते तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. ११ लाखांहून जास्त खटले पाच वर्षपेक्षा जास्त काळ प्रलंबित आहेत. ७३ हजार अशी प्रकरण आहेत जी ३० वर्षांपेक्षा जास्त प्रलंबित आहेत.

**इतकी प्रकरण कोर्टामध्ये का प्रलंबित आहेत?**

**दक्ष संस्थेचे नोंदवलेले निरीक्षण**

२०१६ मध्ये कोर्टामध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांबाबत एक अभ्यास करण्यात आला होता. दक्ष या संस्थेने हा अभ्यास करून एक अहवाल तयार केला होता. या संस्थाने विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या ४० लाखांपेक्षा जास्त खटल्यांच्या आधारावर आपल्या अभ्यास अहवाल सादर केला होता. या अहवालात संस्थेने असं म्हटलं होतं की जर कुठलाही खटला उच्च न्यायलायत गेला तर त्याचा निकाल लागण्यासाठी ३ महिने ते एक वर्ष असा कालावधी लागतो. जर हा खटला जिल्हा किंवा तालुका न्यायालयात गेला तर त्याचा निकाल लागण्यासाठी सहा वर्षे लागतात. जर हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेलं तर १३ वर्षांचा कालावधी लागू शकतो. दक्ष नावाच्या संस्थेने हे निरीक्षण नोंदवलं होतं हायकोर्टातले न्यायाधीश रोज २० ते १५० प्रकरणांची सुनावणी ऐकतात. जर याची सरासरी काढली तर दर दिवशी सत्तर खटले ऐकतात. एक न्यायाधीश एका दिवसात सुनावण्यांसाठी साडेपाच तासांचा अवधी देतात. तर उच्च न्यायालयाचे वकील एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी १५ ते १६ मिनिटं देतात. या न्यायाधीशांच्या कामावर प्रश्न केला जाऊ शकत नाही. कारण रोज न्यायलयात येणाऱ्या खटल्यांची संख्या वाढतेच आहे. देशातल्या विविध न्यायालयांमध्ये अजूनही तेवढे न्यायाधीश नाहीत जेवढ्या न्यायाधीशांची गरज आहे.

**न्यायाधीशांची संख्या कमी का?**

लॉ कमिशनच्या १२० व्या रिपोर्टमध्ये १० लाख लोकांवर ५० न्यायाधीश हवेत अशी शिफारस करण्यात आली होती. हा रिपोर्ट १९८७ मध्ये आली होती. मात्र त्या काळात १० लाख लोकसंख्येवर ११ पेक्षा कमी न्यायाधीश होते. मागच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात केंद्रीय कायदे मंत्री किरण रिजिजू राज्यसभेत ही माहिती दिली होती की भारतात दर १० लाखांच्या लोकांमागे २१ न्यायाधीश आहेत. याचा अर्थ हा आहे की लॉ कमिशनच्या रिपोर्टनंतर ३५ वर्षात १० लाखांवर फक्त ११ न्यायाधीश वाढले. मात्र या कालावधीत लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. किरण रिजिजू यांनी सांगितले होते की मी कायदेमंत्री झालो तेव्हा देशभरातल्या विविध न्यायालयांमध्ये चार कोटी पेक्षा कमी खटले प्रलंबित होते. मात्र आता ही प्रलंबित खटल्यांची संख्या पाच कोटीच्या पुढे गेली आहे. रिजिजू यांनी हे उदाहरणही दिले होते की ब्रिटनमध्ये प्रत्येक न्यायाधीश दिवसाला चार ते पाच खटल्यांचा निर्णय देतो आणि ते खटले मार्गी लावतो. मात्र भारतातले न्यायाधीश हे रोज ४० ते ५० खटल्यांवर सुनावणी करतात. लोक म्हणतात की शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये, पण त्यांना ही कल्पना नसते की कोर्टातले न्यायाधीश किती काम करत असतात. सरकारने दिलेल्या माहितीनुसार सुप्रीम कोर्टात न्यायाधीशांच्या ३४, हाय कोर्टामध्ये १ हजार १०४ तर जिल्हा आणि तालुका न्यायालयांमध्ये २४ हजार ५२१ पदं रिक्त आहेत २८ मार्च २०२२ ची आकडेवारी हेच सांगते.

**दोन खटले जे सांगतात की न्याय मिळणं किती कठीण आहे?**

खटला क्रमांक १- एप्रिल १९९३ मध्ये पोलिसांकडे एक प्रकरण आले. हे प्रकरण असे होते की एक महिला आगीत होरपळली होती. महिलेच्या पतीने हा आरोप केला की त्याच्याच एका नातेवाईकाने पत्नीवर बलात्कार केला आणि नंतर तिला जाळले. मार्च २००२ मध्ये खालच्या कोर्टाने आरोपी दोषी असल्याचा निर्णय दिला आणि त्या आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्यानंतर हे प्रकरण हायकोर्टात पोहचले. एप्रिल २०१६ मध्ये आरोपीचा मृत्यू झाला. त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजेच २०१८ मध्ये हायकोर्टाने सांगितलं की त्या खटल्यातला आरोपी निर्दोष होता. खटला क्रमांक २ सप्टेंबर २००० मध्ये उत्तर प्रदेशातल्या ललितपूर जिल्ह्यात असलेल्या सिलवान या गावात पोलिसांनी एका व्यक्तीविरोधात बलात्कार आणि एससी-एसटी कायद्याच्या अंतर्गत गुन्हा नोंदवला. एका महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप या आरोपीवर होता. फेब्रुवारी २००३ मध्ये कोर्टाने आरोपी दोषी आहे असं सांगितलं आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात गेलं. २०२१ मध्ये कोर्टाने त्याची निर्दोष मुक्तता केली. न्यायालयात हे सिद्ध झालं की महिलेने जो दावा केला की तिच्यासोबत बलात्कार झाला तो झालाच नव्हता. मात्र या सगळ्यात त्या व्यक्तीला २१ वर्षे तुरुंगात काढावी लागली.

# पहिल्या बालसाहित्य संम्मेलनाध्यक्षपदी प्रकाश घादगिने यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर ही एक साहित्यीक व सांस्कृतीक परंपरा लाभलेली नगरी असुन इथे अनेक नामवंत लेखक,कवी,कांदबरीकार व विचारवंतानी आपले अमुल्य असे योगदान दिलेले आहे. त्यात देविसिंह चौहान, डॉ.जनार्धन वाघमारे, डॉ.सुर्यनारायण रणसुभे, रा.रं.बोराडे, डॉ.शेषेराव मोहिते, अतुल देऊळगावकर, नागोराव कुंभार, रमेश चिल्ले, श्रीराम गुंदेकर, राजा होळकुंदे, विनय अपसिंगेकर, भारत सातपुते, योगिराज माने, सुरेंद्र पाटील अशा नामंवत विचारवंत, लेखक, कवीनी ही परंपरा पुढे चालु ठेवली आहे. बालसाहित्यातही आपला वेगळा ठसा उमटवणारे लेखन इथली साहित्यीक मंडळी करीत असतात. त्यात प्रकाश घादगिनें यांचे नाव आग्रहाने घ्यावे लागेल. अ.भा.मराठी साहित्य संस्था शाखा लातूरची कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली असुन ज्येष्ठ साहित्यीक रमेश चिल्ले यांनी अध्यक्ष म्हणुन जबाबदारी स्वीकारली आहे.

त्यानिम्मीताने उदघाटन व पहिले बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या पहिल्या संमेलनास अध्यक्ष म्हणुन ज्येष्ठ बाल साहित्यीक व व्यंगचित्रकार प्रकाश घादगिने यांची निवड करण्यात आली आहे. प्रकाश नगरातील बालविकास शिक्षण प्रसारक मंडळाच्या सरस्वती विदयालयात दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता पूण्याच्या केंद्रीय कार्यकारिणीचे अध्यक्ष मा.राजने लाखे यांच्या हस्ते सम्मेलनांचे उदघाटन होणार आहे. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.दिलीप गरूड, विलास रासकर व भरत सुरसे संस्थेचे सचिव ॲड.लक्ष्मणराव भागवत हे राहणार आहेत.तर प्रमुख उपस्थितीती विजय जगताप, प्रशांत गौतम व मुख्याध्यापक कालीदास शेळके यांची असणार आहे. या प्रसंगी नुकताच राज्यशासनाचा साने गुरूजी बालकथा पुरस्कार मिळालेल्या लेखिका वृषाली पाटील व स्वाराती विदयापीठ नांदेड च्या अधिसभा सदस्यपदी निवड झालेल्या उमा व्यास यांचा सत्कार करण्यात येणार आहे.यावेळी कथाकथन डॉ.दिलीप गरूड यांच्या अध्यक्षतेखाली होणार असुन त्यात जी.जी. कांबळे ज्येष्ठ कथाकार व शैलजा कांरडे भाग घेतील तर कविसंमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी भारत सातपुते असुन त्यात सर्वश्री रमेश चिल्ले,नागनाथ कलवले, कल्याण राऊत, वृषाली पाटील, उषा भोसले,सविता धर्माधिकारी, विमल मुदाळे, दतप्रसाद झंवर, छगन घोडके, गोविंद गारकर,रमेश हणमंते, क्रांती मोरे, विजया भणगे,सुनिता मोरे,प्रभा वाडकर, महेंद्र गायकवाड, सुलक्षणा सोनवणे, सीमा हिप्परगेकर, नंदिनी पूजारी, उमा व्यास, निलीमा देशमुख यांचा सहभाग असुन कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नयन राजमाने व सुनिता देशमुख तर आभार प्रदर्शन राजकुमार दाभाडे मानणार आहेत असे अध्यक्ष रमेश चिल्ले व सचिव नागनाथ कलवले यांनी कळवले आहे. तरी शहरातील बालसाहित्यावर प्रेम करणार्या विदयार्थी व साहित्यांकानी उपस्थित राहवे असे आव्हान आयोजन समीतीने केले आहे.

## मराठी पत्रकार परिषद, मुंबईतर्फे आदर्श तालुका पूरस्कार वितरण सोहळा!

# तालुका अध्यक्षांचा मेळावा ५ मार्च रोजी चाकूरला होणार!

### पिंपरी-चिंचवड ते चाकूर पत्रकार एकता रॅली निघणार

**देवणी/शकील मनियार**



मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार आणि तालुका अध्यक्षांचा मेळावा लातूर जिल्ह्यातील चाकूर येथे ५ मार्च २०२३ रोजी संपन्न होत असल्याची घोषणा एस.एम देशमुख यांनी केली आहे. मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तालुका पत्रकार संघांना वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्काराने आणि रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा, जिल्हा पत्रकार संघ पुरस्काराने गौरविण्यात येते, पुरस्कार वितरण सोहळे प्रामुख्याने ग्रामीण भागातच घेतले जातात, यावर्षी हा सोहळा चाकूर येथे होत आहे. दि. ५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता पुरस्कार वितरण सोहळा सुरू होईल. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी यावं यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत, भाजपचे राज्य प्रवक्ते गणेश हाके हे कार्यक्रमाचं स्वागताध्यक्ष असतील. चाकूर मेळाव्याच्या निमित्तानं पिंपरी-चिंचवड ते चाकूर अशी पत्रकार एकता रॅली काढली जाणार आहे. ही रॅली ३ मार्च रोजी सकाळी ८ वाजता पिंपरी-चिंचवड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघेल तसेच पिंपरी चिंचवड, पुणे, रांजणगाव, शिरूर, पारनेर, नगर, कडा, आष्टी, जामखेड, पाटोदा मार्गे रात्री बीडला पोहचेल,रॅलीचा मुक्काम बीड येथे असेल, रॅली ४ मार्च रोजी सकाळी चौसाळा येथे जाईल, तेथून केज, अंबाजोगाई, रेणापूर, लातूर मार्गे चाकूरला जाईल,चाकूर मध्ये मिरवणूक काढली जाईल, रॅली ज्या ज्या शहरातून जाईल तेथील पत्रकार आणि लोकप्रतिनिधी रॅलीचं गावच्या वेशीवर स्वागत करतील. रॅलीत एस.एम देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, मिलिंद अष्टीवकर, मन्सूरभाई, विजय जोशी तसेच परिषदेचे अन्य पदाधिकारी असतील, ज्या गावातून रॅली जाईल तेथील तालुका, जिल्हा पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य रॅलीत सहभागी होतील, रॅली आपल्या गावात किती वाजता पोहचेल हे दोन दिवस अगोदर कळविले जाईल, गाडीवर एक स्टीकर असेल, परिषदेचा ध्वज गाडीवर असेल, रॅलीत किमान ५० गाड्या असाव्यात यादृष्टीने नियोजन केले जात आहे,रॅली आणि मेळावा यशस्वी करण्यासाठी टीम चाकूर जोरदार प्रयत्न करीत आहे,या मेळाव्यासाठी राज्यभरातून किमान ६०० प्रतिनिधी उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे, तसे नियोजन स्थानिक संयोजन समिती करीत आहे. यंदाचे पुरस्काराचे मानकरी तालुके पुढील प्रमाणे, नागपूर विभाग : मोहाडी तालुका पत्रकार संघ जिल्हा भंडारा, अमरावती विभाग : धामणगाव तालुका पत्रकार संघ, जिल्हा अमरावती, लातूर विभाग : औढा नागनाथ तालुका पत्रकार संघ जिल्हा हिंगोली, नाशिक विभाग : अमळनेर तालुका पत्रकार संघ, जिल्हा जळगाव, पुणे विभाग: पुरंदर तालुका पत्रकार संघ जिल्हा पुणे,कोल्हापूर विभाग : जत तालुका पत्रकार संघ, जिल्हा सांगली, औरंगाबाद विभाग : पैठण तालुका पत्रकार संघ, जिल्हा औरंगाबाद, कोकण विभाग : महाड तालुका मराठी पत्रकार संघ जिल्हा रायगड पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त १० कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीचे मतदान ३० जानेवारी,२०२३ रोजी होणार आहे. ज्या मतदारांना निवडणूक आयोगाकडून ओळखपत्र देण्यात आले आहे त्यांनी ते सादर करणे आवश्यक आहे. मतदान केंद्रांवर मतदारांची ओळख पटविण्यासाठी जे मतदार ओळखपत्र (एझखउ) सादर करु शकत नाहीत, अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या (EPIC) व्यतिरिक्त १० कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य असल्याचे निवडणूक आयोगाने कळविले आहे. १) आधार कार्ड २) वाहन चालक परवाना ३) पॅन कार्ड ४) भारतीय पारपत्र ५) केंद्र/ राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम/पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी वितरीत केलेले फोटोसह सेवा ओळखपत्र ६) खासदार/आमदार यांचे अधिकृत ओळखपत्र ७) संबंधित शिक्षक मतदारसंघातील शिक्षण संस्थेत कार्यरत असलेल्या मतदारांना वितरीत केलेले सेवा ओळखपत्र ८) विद्यापीठाद्वारे वितरित पदवी/पदवीका मुळ प्रमाणपत्र ९) सक्षम प्राधिकरणाद्वारे वितरीत केलेले दिव्यांगत्वाचे मुळ प्रमाणपत्र १०) भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने वितरीत केलेले युनिक डिसॅबिलीटी ओळखपत्र इत्यादी कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याबाबत निवडणूक आयोगाने कळविले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

23 To 29 JANUARY 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 1/21/2023 8:15 PM Page 1



# भिवंडीतून दीड कोटींच्या रुग्णालय उपकरणे चोरीच्या गुन्ह्याचा नारपोली पोलिसांनी लावला २४ तासात छडा

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी तालुक्यातील मानकोली येथील रुग्णालय उपकरणे साठविलेल्या गोदमातील घरफोडीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासात छडा लावण्यात नारपोली पोलिसांनी यश मिळविले आहे. अटक केलेल्या एका आरोपीस ताब्यात घेत त्याच्या जवळून चोरीचा १ कोटी २५ लाख ६१ हजार ९६८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार मानकोली येथील श्री माँ बिल्डींग या गोदमातील दोन गाळ्यां मध्ये महागडे सोनोग्राफी, रोबोटीक रुग्णालय उपकरणे साठविण्यात आले होते. त्याठिकाणी १५ जानेवारी रोजी मध्यरात्री घरफोडी होऊन १ कोटी ३८ लाख ५ हजार ६२७ रुपयांच्या उपकरणांची चोरी करण्यात आली होती. या घटनेची माहिती मिळाल्यावर कंपनीच्या वतीने १९ जानेवारी रोजी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता.पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे विभागाचे सहाय्यक पोलीस




निरीक्षक चेतन पाटील व त्यांच्या सोबत पोहवा जयराम सातपुते, महेश महाले, सुशिल इथापे, समीर ठाकरे, राजेश पाटील, संदीप जाधव, प्रदिप मांजरे, सचिन देसले, जनार्दन बंडगर, विजय ताटे या पथकाने घटनास्थळी कोणताही पुरावा नसताना या गुन्ह्याचा कौशल्यपूर्ण तपास करीत एका आरोपीस अटक करीत त्या जवळून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे अशी माहिती पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

घरफोडी करणाऱ्या चोरट्यांनी मागे कोणताही पुरावा ठेवला नसताना व गोदाम परिसरात लाईट अथवा सीसीटीव्ही नसल्याने आरोपी शोधण्याचे आव्हान पोलिसां समोर होते. घटनास्थळाच्या काही अंतरावरील आजुबाजुस असलेले सिसिटीव्ही मध्ये पहाटेच्या सुमारास एका गाडीच्या लाईटचा प्रकाश दिसुन आल्याने तोच धागा पकडून त्या रस्त्यावरील पुढील सिसिटीव्ही कॅमेरे तपासले असत सदरचा प्रकाश हा एका संशयित पिकअप टेम्पो वाहना चा असल्याचे समजल्यावर पोलीस शिपाई सचिन देसले व जनार्दन बंडगर यांनी या मार्गा वरील ३४ ठिकाणी लावलेल्या सिसिटीव्हीची पाहणी करून टेम्पोचा क्रमांक एम एच ०४ जी आर ८४४६ असल्याचे निष्पन्न केले. त्यावरून टेम्पो मालक मोहमंद सलीम मोहमंद इद्रीस चौधरी, वय ४१, रा.घुंघट नगर भिवंडी यास ताब्यात घेऊन त्याकडे कौशल्यपूर्ण चौकशी केली असता त्याने तीन साथिदारांच्या मदतीने चोरी करून सदरचा माल हा त्याच्या टेम्पो मधुन घेवुन गेला असल्याचे कबुल केले.

त्यानंतर आरोपी मोहमद सलीम चौधरी यास या घरफोडीच्या गुन्हयात अटक करून त्याच्या जवळून १ कोटी २५ लाख ६१ हजार ९६८ रुपये किमतीची उपकरणे जप्त केले आहेत. या गुन्ह्यात फरार आरोपींचा शोध तपास अधिकारी चेतन पाटील व त्यांचे पोलीस पथक हे वरिष्ठांच्या मार्गदर्शना खाली करीत आहेत.

## भरधाव ढंपरची रिक्षाला धडक गरोदर महिलेसह दोन जखमी!





**वाडा/प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र वज्रेश्वरी जवळील गाडगे बाबा आश्रम शाळेजवळ एका भरधाव वेगाने अंबाडी दिशेने जाणाऱ्या ढंपरने रिक्षाला मागून जोरदार धडक दिल्याने त्यातील एक चार महिन्यांची गरोदर असणारी महिला आणि इतर दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. कामण येथील रुपेश माळी हे आपली चार महिन्याची गरोदर पत्नी पूजा माळी हिला घेऊन अंबाडी नाका येथे तपासणीसाठी आपल्या रिक्षात घेऊन जात असताना गाडगेबाबा आश्रम शाळेजवळ आले असताना मागून येणाऱ्या एमएच-२८ बीबी-२७०९ या भरधाव वेगाने येणाऱ्या ढंपरने धडक दिल्याने रिक्षा चालवत असलेला रुपेश आणि त्याची गरोदर पत्नी त्याचबरोबर कुसुम चव्हाण वय ६५ ही वयोवृद्ध महिला जखमी असता आहेत. ही घटना १०८ रुग्णवाहिकेचे सहा.व्यवस्थापक मिलिंद कांबळे यांना कळविले असता त्यांनी तात्काळ आपली रुग्णवाहिका त्या ठिकाणी पाठवून जखमींना दवाखान्यात नेले असता गरोदर असणाऱ्या पूजाला अधिक उपचारासाठी वसई येथे हलविण्यात आले आहे. याबाबत अधिक तपास गणेशपुरी पोलीस करीत आहेत.

## चोरीस गेलेला बोलेरो पिकअप कर्नाटकातून हस्तगत!

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील (रा.उळे ता.द. सोलापूर) येथील नागनाथ बब्रुवान धनवडे हे एव्हरेस्ट इंफ्रास्टक्चर व डेव्हलपमेंट यांनी त्यांचे गंगेवाडी येथील कंपनी मधुन अज्ञाताने कंपनीच्या मालकीचे ८ लाख रुपये किंमतीचे बोलेरो पिकअप टँकर एमएच १३-सीयु-२१९१ व त्यामध्ये १६०० लिटर डिझेल असा एकूण ९ लाख ४८ हजार १६० रुपये किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेल्याची तक्रार सोलापूर तालुका, पोलीस ठाणेस ९ डिसेंबर रोजी दाखल झाली होती. सोलापूर तालूका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे याचे यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक सुनील बनसोडे याचेकडे देण्यात आला होता. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरणातील कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे गुन्हयातील अज्ञात आरोपी याचे मार्गावर असताना त्यांना गुन्हयातील चोरी केलेला पिकअप टँकर हा जोडमोटे वस्ती मंद्रुप येथील प्रवीण भोजप्पा जोडमोटे, वय २२ (रा. मंद्रूप ता.दक्षिण




सोलापूर) या संशयित आरोपी याच्या ठावठिकाणाची माहिती गोपनियरित्या माहिती काढुन त्याचे गुन्हयाचे तपासकामी पुणे येथुन ताब्यात घेऊन त्याचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्याने गुन्हयातील चोरी केलेला पिकअप टँकरची चोरी केला असल्याची कबुली दिली आहे. गुन्हयातील चोरीस गेलेला ८ लाख रुपये किंमतीचा बोलेरो पांढरे रंगाचा पिकअप (टँकर) हा हुमनाबाद राज्य कर्नाटक येथुन हस्तगत केला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास सुनिल बनसोडे हे करीत आहेत. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती , यांच्या मार्गदर्शनाखाली व सोलापूर तालुका पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक सुनिल बनसोडे, पो. हवालदार संजय देवकर, पोना शशीकांत कोळेकर, पोलीस अंमलदार, पैंगबर नदाफ, फिरोज बारगीर व सायबर पोलीस ठाणे कडील रवि हटकिळे यांनी बजावली आहे.

## जेऊर येथे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा २२ एप्रिलला होणार

**सिमेवर कार्यरत तालुक्यातील सैनिकांचा देखील होणार गौरव**

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील जेऊर (ता.अक्कलकोट) येथे श्री काशीलिंग बहुऊद्देशिय संस्थेच्या वतीने शनिवार २२ एप्रिल रोजी सायंकाळी ६ :४५ वाजता अक्कलकोट रोडवरील श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन जेऊर येथे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. यावेळी काशी जगद्गुरू डॉ मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी, खासदार डॉ जयसिद्धेश्वर महास्वामी, श्री शिवकुमार महास्वामी, श्री जडेय शांतिलिंगेश्वर महास्वामी, श्री शिवानंद शिवयोगी महास्वामी, श्री बसवलिंग शिवयोगी महास्वामी, शिवयोगी शिवाचार्य महास्वामी, निळकंठ शिवाचार्य महास्वामी, श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, राजशेखर शिवाचार्य महास्वामी, मळेंद्र महास्वामी, श्री अभिनव बसवलिंग महास्वामी, शांतलींग शिवाचार्य महास्वामी, महानंदा ताई मुगळी, सोमलिंग घुळी महाराज, सद्गुरू पांडुरंग महाराज, पिरजादे बाबा, कुंभार मठ, मादन हिप्परगा, इब्राहिमपूर आदी मठाधिश उपस्थित राहणार आहेत. याचवेळी अक्कलकोट तालुक्यातील रहिवाशी परंतु



सध्या देशाच्या विविध भागातील सिमेवर देश रक्षण करीत असलेल्या सैनिक बांधवांचा सन्मान सोहळा देखील होणार आहे. ग्रामीण भागात सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे आर्थिक अडचण तसेच वाढत चाललेली प्रचंड महागाई यामुळे नागरिकांना आपल्या मुलामुलींची लग्ने लावणे आणि त्याची जबाबदारी हे खूपच खर्चिक आणि न झेपणारे ठरत आहे. श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व श्री काशीलिंग बहुऊद्देशिय संस्थेच्या वतीने यंदा जेऊरला कोरोनाकाळ वगळता सलग ६ व्या वर्षी सामुदायिक विवाह सोहळा आयोजीला जात आहे. या संस्थेत एकूण २०० मित्रपरिवार सदस्य एकत्र येऊन तन, मन, धनाने योगदान देत आहेत. श्री काशीलिंग बहुद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील व मित्रपरिवारांकडून ४ वर्षात १३४ जोडपे विवाहबद्ध झाली आहेत तर चालू वर्षी सुद्धा जोडप्यांचा विवाह सोहळा त्यात्या धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे पार पडणार आहे.या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. दरवर्षी साधारण पन्नास हजार वऱ्हाडी उपस्थित राहत असतात.यात प्रामुख्याने वधू वरांना पोशाख, मणी-मंगळसूत्र, वऱ्हाडी मंडळींना,गावातील मुख्य रस्त्यावरून वधू वरांची मिरवणूक, भोजन,शिदोरी आदींची व्यवस्था केली आहे.या विवाह सोहळ्याचे नियोजन काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व काशिलिंग बहुउद्देशीय संस्था तसेच कार्यकर्ते व ग्रामस्थ मंडळी जेऊर हे करीत आहेत मंडळी करीत आहेत.याचवेळी अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधवाचा देखील पत्रकार दिनाचे औचित्य साधत सन्मान करण्यात आला. या पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन पाटील, शिवाजीराव कलमदाणे, उपसरपंच काशिनाथ पाटील, सुरेश सोनार, काशिनाथ कवठे, शिवनिंगप्पा पत्रिगीडा, काशिनाथ रामपुरे, इरण्णा कणमुसे, अंबाराया कनोजी, इरप्पा कोळी, शिवराज बोरीकरजगी, सिद्धाराम कापसे, मल्लिनाथ करपे, रमेश गोगावे, काशिनाथ कापसे, मल्लिनाथ मणुरे, महेशकुमार चानकोटे, सिद्धाराम बामणे, शिवपुत्र चौलगी, श्री काशीविश्वेश्वर हायस्कूल जेऊरचे मुख्याध्यापक राजशेखर चौधरी, बसवराज वग्गे, रवि स्वामी आदींची उपस्थिती होती.

### तालुक्यातील कार्यरत सैनिकांचा होणार सन्मान

आपले कुटुंब सोडून हजारो किलोमीटर दुर राहून आपल्या देशासाठी लढत असलेल्या अक्कलकोट तालुक्यातील सध्या सिमेवर कार्यरत असलेल्या सैनिकांचा अभिमान बाळगून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष्याचे औचित्य साधत त्यांचा सन्मान सामुदायिक विवाह सोहळ्याच्या निमित्ताने केला जाणार आहे.

## कुडूस नाका येथे गतिरोधकाची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील कुडूस येथे मोठी बाजारपेठ असल्याने कुडया नाका येथे नेहमीच वर्दळ असते, विशेतः शुक्रवारी आठवडी बजार भरत असेलताने या दिवशी दुकानदार व ग्राहक यांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते तर वाहणांची वर्दळ असते. कुडूस नाका हा भिवंडी वाडा महामार्गावर असल्याने अवजड वाहणांची अतिवेगात असल्याने या ठिकाणी अपघातही नेहमीच होत असतात. या वाहनां वेग मर्यादित राहण्यासाठी गतिरोधक असणे आवश्यक झाले आहे. दोन दिवसांपूर्वी ओनिडा कंपनी समोर दोन ट्रक व कारचा अपघात झाला होता. असे अपघात टाळण्यासाठी चिंचघर कडे जाणारा रस्ता, प्रगती नगर व डॉ. बाबासाहेब नगर कडे जाणाऱ्या रस्त्यांच्या ठिकाणी महामार्गावर सफेद पट्टे मारलेल्या गतिरोधकांची अत्यंत आवश्यकता आहे. भविष्यात होणारे अपघात टाळण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अं) चे महाराष्ट्र सचिव रमेश भोईर यांनी वाड्याचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

## बालविवाह प्रतिबंध झालाच पाहिजे-प्रा.कुसुम मोरे

**लातूर/प्रतिनिधी**

जी. के. जोशी रात्रीचे वाणिज्य महाविद्यालय, लातूरच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आयोजित बोरवटी येथे एन. एस. एस. कॅम्पच्या समारोप सत्राच्या प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ.कुसुमताई मोरे यांनी बालविवाह प्रतिबंध या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सुजाता चव्हाण मॅडम होत्या. याप्रसंगी आपल्या व्याख्यानात प्राचार्य मोरे मॅडम म्हणाल्या की, बालविवाहाचे अनिष्ट परिणाम मुलींवरच नाही तर त्यांच्या अपत्यावर ही होतात. बालविवाह केल्याने मुलावर होणारे आरोग्यविषयक परिणाम देखील खूप आहेत केवळ आपली जबाबदारी कमी करण्यासाठी प्रामुख्याने मुलींचे पालक बालविवाहाला प्राधान्य देतात परंतु ज्या कुटुंबात शिकलेले आई वडील आहेत त्या कुटुंबात बालविवाहाचे प्रमाण कमी आहे. तेव्हा संविधानाने दिलेली वयोमर्यादा पाळूनच मुलांची लग्न करावेत असे आग्रही प्रतिपादन मोरे यांनी केले. तसेच याविषयी समाजामध्ये जाणीव जागृती तितकिच महत्त्वाची आहे. नारी प्रबोधन मंच लातूर यांच्या वतीने हाती घेतलेले निर्भय आम्ही सक्षम आम्ही ही प्रबोधनाची चळवळ कशी महत्त्वाची आहे? मुली कशा पद्धतीने सक्षम झाल्या पाहिजेत? याविषयी पण मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य सुजाता चव्हाण यांनी समायोजित मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन प्रयाग यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. नयन राजमाने यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, जि.प. मौजे. बोरवटीचे विद्यार्थी, शिक्षक, येथील नागरिक यांनी सहकार्य केले. या प्रसंगी बहुसंख्येने विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत



### वाडा तालुका पत्रकार संघातर्फे ब्लँकेट वाटप

वाडा : वाडा तालुका पत्रकार संघाच्या वतीने तालुक्यातील अतिदुर्गम साखरशेत या गावातील गरजवंतांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. साखरशेत गावातील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक प्रताप डोहाळे, सहशिक्षक ज्ञानेश्वर व्यवहारे यांनी सहकार्य केले. तर मुंबई येथील महेन हरसोरा व जीवन सेवा ट्रस्ट अध्यक्ष कमलाकर पाटील सचिव जयेश गोळे यांनी ब्लँकेट उपलब्ध करून दिले. पत्रकार मच्छिन्द्र आगिवले, सचिन भोईर, शेखर पवार व संजय लांडगे तांच्या हस्ते ब्लँकेट वाटप करण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामदास खरपडे, सुनील रंधा, सदु खरपडे सोबत अनेक गावकरी उपस्थित होते.



### वाहतूक पोलीस विभागातर्फे रक्तदान शिबिर

भिवंडी : २३ व्या रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त भिवंडी वाहतूक पोलीस विभागातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनीष पाटील यांनी रक्तदान करून या शिबिराचा शुभारंभ पोलीस संकुल येथे करण्यात आला. भिवंडी ब्लडबँकेच्या माध्यमातून आयोजित या शिबिरात युवक संघटना, रिक्षा चालक संघटनेच्या सहकाऱ्यांनी रक्तदानात सहभाग घेतला.

### शालेय कबड्डी स्पर्धेचे थाटात उदघाटन

लातूर : प्रो-कबड्डीमुळे कबड्डीला चांगले दिवस आले असून लातूरचे क्रीडा संकुल कबड्डीपटूसाठीच्या सरावासाठी सर्वसोयीयुक्त असल्याचे प्रतिपादन लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले. जिल्हा क्रीडा संकुलात १७ वर्षाच्या खालील वयोगटाच्या मुले, मुली यांच्या राज्यस्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचे उदघाटन लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ऑलिम्पियन व राष्ट्रीय ध्यानचंद पुरस्कार विजेते शाहूराज बिराजदार, कबड्डी खेळातील महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार विजेते गणपतराव माने, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मोईज शेख, शिवछत्रपती पुरस्कार विजेते दत्ता गल्लाले, शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्रीरंग बंडापल्ले, शिवछत्रपती पुरस्कार विजेते धर्मपाल गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे उपस्थित होते. यावेळी राज्यातून विविध जिल्ह्यातून आलेल्या खेळाडूंसाठी उत्कृष्ट लोककलांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी सर्व कबड्डी संघाकडून संचलन करून पाहुण्यांना मानवंदन देण्यात आली. उदघाटन सामना मुले अमरावती विभाग विरुद्ध पुणे विभाग तर मुलींचा औरंगाबाद विभाग विरुद्ध नाशिक विरुद्ध असा सामना रंगला.

### मांजाने घेतला दुचाकी चालकाचा बळी



भिवंडी : नायलॉन च्या मांजा वर महाराष्ट्रात बंदी असतानाही त्याचा सर्रास वापर पतंग उडवताना केला जात आहे. अशाच एका नायलॉनच्या मांजाने भिवंडी शहरातील कल्याण नाका येथील स्व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुला वरून दुचाकी वरून जाणाऱ्या व्यक्तीचा बळी घेतला आहे. संजय कबीर हजारे वय ४७ रा. उल्हासनगर ३ असे बळी गेलेल्या निष्पाप व्यक्तीचे नाव आहे. ही घटना उड्डाणपुलावर नवीबस्ती परिसरात घडली असून शहर पोलीस ठाण्यात या अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस या घटनेचा तपास करीत आहेत.

### श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे चित्रकला स्पर्धेत नेत्रदीपक यश

लातूर : रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत येथील अभिनव मानव विकास शिक्षण संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली आहेत. या विद्यालयातील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी कु. तेजस्विनी दीपक तिपराळे हिने या स्पर्धेत सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला. तिच्या या यशाबद्दल तिला सायकल पारितोषिक म्हणून देण्यात आली. इयत्ता तिसरीच्या वर्गातील अथर्व राहुल काळे व रुद्र प्रवीण मिरकले यांनी सर्वद्वितीय तर कु. नक्षत्रा रामचंद्र पाटील हिने सर्वतृतीय येण्याचा बहुमान पटकावला. या यशस्वी विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ मिडटाऊनचे अध्यक्ष वीरेंद्र फुंडीपल्ले , सचिव अमोल दाडगे , श्रीनिवास भंडे , प्रोजेक्ट चेअरमन पवन मालपाणी, रो. मोतीलाल वर्मा, चापसी सायकलचे संचालक नितीन चापसी, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत समारंभपूर्वक पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांसह सर्व शिक्षक - शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

23 To 29 JANUARY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/21/2023 8:16 PM Page 1



पान १ वरून...

## प्रेयसीच्या डबल गेमने लव्ह स्टोरीचा...

प्रेयसीचे पहिल्या प्रियकराशी पुन्हा प्रेमसंबंध सुरु असल्याचा त्याला संशय आला. यावरुन तो तरुणीसह तिच्या जुन्या प्रियकराशी वाद घालू लागला. ललितने आदित्यला आपल्यात आणि तरुणीमध्ये कोणतंही नातं नसल्याचं समजून सांगितले. तसेच तरुणीचे कुत्र्याचे पिल्लू आपल्याकडे आहे ते एकदाच घेऊन जा असे सांगत त्याने वाद मिटवण्यास सांगितला.भररस्त्यात पहिल्या प्रियकराने दुसऱ्याला संपवले. यानंतर आदित्य आणि त्याची प्रेयसी कल्याण विठ्ठलवाडी परिसरात ललितच्या घराजवळ पोहोचले. बोलता बोलता दोघांमध्ये पुन्हा वाद सुरू झाला. या वादात ललितने आणि त्याच्या चार मित्रांनी मिळून आदित्यला मारहाण करत, त्याच्या छातीवर चाकूने वार करत जागीच ठार केले. चारही आरोपींनी तेथून पळ काढत मध्यप्रदेश गाठले. मात्र या आरोपींना माहिती नव्हतं त्यांचा पाठलाग करत कल्याण कोळसेवाडी पोलीस मध्य प्रदेशमध्ये पोहोचले होते.

स्टेशनवर त्यांची गाडी थांबताच बाहेर जाण्याचा मार्ग विचारेपर्यंत कोळसेवाडी पोलिसांच्या टीमने त्यांना मध्य प्रदेशच्या बरहानपूर रेल्वे स्टेशनवरच ताब्यात घेतले. सध्या सर्व आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून अधिक तपास कोळसेवाडी पोलीस करत आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र देशमुख, पोलीस निरीक्षक सुनील गवळी तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बोचरे, सहायक पोलिस निरीक्षक पगारे, पोलीस हवालदार हनुमंत शिर्के, प्रमोद जाधव, सचिन कदम, मिलिंद बोरसे यांच्या पथकाने कामगिरी करत आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

## मध्यस्थी करणाऱ्याचा भांडणाऱ्यांनी घात...

लगेच या घटनेची माहिती कोणी तरी नागपाडा पोलिसांना दिली. नागपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेशकुमार ठाकूर, पो.नि. दुष्यंत चव्हाण, पो. नि. (गुन्हे )रईस शेख, सपोनि सोमनाथ काळे, प्रवीण चव्हाण, गणेश पाटील, चिंदळे, ननावरे,व पो.उ.नि. चंदवाडे, इत्यादी लागलीच घटनास्थळी दाखल झाले. यावेळी घटनास्थळी दोन इसम जबर जखमी झालेले दिसून आले.या दोघांच्या अंगावर वार केल्याचे दिसून येत होते.पोलिसांनी या दोघांना तात्काळ वैदयकिय उपचारासाठी भायखळा येथील सर जे.जे. रूग्णालयात दाखल केले. मात्र अति रक्तस्त्राव झाल्यामुळे यातील आमास मोहम्मद एहसास कुरेशी (२५) या तरुणाचा मृत्यू झाला.तशी माहिती डॉक्टरांनी पोलिसांना दिली. पोलिसांनी उपचार घेत असलेल्या त्याच्या भावाकडे या सर्व गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता, त्याने वेगळीच माहिती पोलिसांना दिली. १७ जानेवारी रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजताच्या दरम्यान फिगो इमारत, शुक्लाजी स्ट्रीट, नागपाडा, मुंबईच्या आवारात व इमारतीबाहेर अरब गल्ली, नागपाडा, येथे इजाज सुपारीवाला व त्याचा भाऊ फैजान, तसेच इजाज सुपारीवाला यांची दोन्ही मुले फरहान व अहमद, मुलगी, पत्नी आणि सारीक नावाच्या व्यक्तीने आपसांत संगनमत करून आम्हा दोघां भावंडावर चाकू व कोयत्याने हल्ला केला .या हल्ल्यात माझा भाऊ ठार झाला . तसेच माझ्यावर जीवघेणा हल्ला करून मला ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी त्यांच्या विरुद्ध कायदेशीर तक्रार आहे . नागपाडा पोलिसांनी कुरेशी यांच्या फिर्यादी वरून नागपाडा पोलीस ठाण्यात गु.र.क. ९२/२३. कलम ३०२, ३०७, ३६३. १२०(ब), ३२३, ५०४, ५०६, १४१, १४२, १४३, १४५ १४६,१४७, १४८, १४९ भा.द. वि. सह भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीसांनी प्राप्त माहितीच्या आधारे तसेच मिळालेले वर्णन व नावे यावरून रात्रीच्या दरम्यान आरोपीचा शोध सुरू केला. पोलीस पथकास मिळालेल्या माहिती प्रमाणे पोलीस पथकाने नागपडा , डोंगरी, सर जे. जे. मार्ग पोलीस, व्ही.पी. रोड पोलीस ठाणे हद्दीत संशयित आरोपीतांचा शोध सुरू केला. पोलीसांनी केलेल्या जलद तपासाअंती गुन्हयातील पाहिजे आरोपी फैजान सुपारीवाला आणि वारीस अनिस बेग या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. तसेच गुन्हयामधील पाहिजे आरोपी शारीक अब्दुल गफ्फार कुरेशी हा व्ही. पी. रोड तसेच डि.बी. मार्ग पोलीस ठाणे हद्दीत येणार असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्यावरून स.पो.नि. काळे, पो.उ.नि. चंदवाडे, पो.उ.नि. घाग, व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी त्याचा कसून शोध घेवून शारीक अब्दुल गफ्फार कुरेशी यास दोन टाकी परीसरातुन शीताफिने ताब्यात घेवून अटक करण्यात आली.तसेच एक विधीसंघर्षगस्त बालकास ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी या गुन्ह्यात आतापर्यंत तीन संशयित आरोपींना अटक करून त्यांच्याकडे केलेल्या तपासत सदर माहिती पुढे आली.ती अशी..! इजाज सुपारीवाला याने त्याच्या ओळखीचा व्यक्ती रिहान कुरेशी याच्या पत्नीला, रिहान यांचे तृतीयपंथीय सोबत असलेले फोटो पाठवले होते.त्यामुळे रिहान कुरेशी चिडला.त्याने माझे तृतीयपंथीय सोबत असलेले फोटो माझ्या पत्नीला का पाठवले असा प्रश्न केला असता त्यावरून या दोघात भांडण सुरू झाले. त्या भांडणात फिर्यादी मोहम्मद कुरेशी यांनी मध्यस्ती केल्याने इजाज सुपारीवाला व त्याचा भाऊ फैजान यांना राग आला. तोच राग मनात ठेवून इजाज सुपारीवाला व त्याचा भाऊ फैजान, मुले, पत्नी व मुलगी व सारीक नावाच्या व्यक्तीने आपसात संगनमत करून फिर्यादी यांना हाताने मारहाण व शिवीगाळ करून चॉपरने वार करून गंभीररित्या जखमी केले व जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला .ही माहिती मिळताच फिर्यादी यांचा भाऊ आमास मोहम्मद ऐहसान कुरेशी हा फिर्यादी यांच्या बचावासाठी आल्याने संशयित आरोपींनी त्याच्यावर सुध्दा धारदार चॉपरने व चाकूने वार करुन त्याचा खून केला. या गुन्हातील आरोपीताविषयी त्रोटक माहिती असताना पोलीस पथकाने नियोजन बध्द रित्या प्राप्त वर्णनावरून अतिशय जलदगतीने व कौशल्यपूर्ण तपास करून गुप्त बातमीदार व तांत्रीक कौशल्य वापरून चिकाटी व टीमवर्कने केलेल्या कामामुळे गुन्हयातील आरोपीताना निष्पन्न करून आरोपीतांपैकी तात्काळ तीन आरोपी व एक विधीसंघर्षगस्त बालकास ताब्यात घेण्यात यश आले आहे. या गुन्हयातील इतर पाहिजे आरोपी यांचा शोध सुरू असून त्यांना लवकरच गुन्हयात अटक करण्यात येईल अशी माहिती पोलिसांनी दिली. अशाप्रकारे जलद गतीने तपास करुन गुन्हा दाखल केल्यानंतर अवघ्या ७३ तासात गुन्हा उघडकीस आणण्यात नागपाडा पोलीसांना यश प्राप्त झाले. मुंबई पोलीस सह आयुक्त (का. व सु.) सत्यनारायण चौधरी, अपर पोलीस आयुक्त अनिल कुंभारे,पोलीस उप आयुक्त अकबर पठाण, सहायक पोलीस आयुक्त संजय कुरुंदकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेशकुमार ठाकूर, पो.नि. दुष्यंत चव्हाण, पो. नि. गुन्हे रईस शेख, सपोनि सोमनाथ काळे, प्रवीण चव्हाण, गणेश पाटील, चिंदळे, ननावरे, पोउनि चंदवाडे, अक्षर शेख, अजिम शेख, घाग, मपोउनि. पटेल, मपोउनि धोत्रे इत्यादीनी या गुन्ह्यात महत्वाची भूमिका पार पाडली.

## दिराच्या सहवासासाठी पत्नीचा तोल ...

रिकामपण असलेल्या दुपारच्या वेळात टीव्हीवरील या मालिकांची वेळ निश्चित केली जाते. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण असलेल्या या मालिका सामाजीक आणि कौटूंबिक वातावरण गढूळ करत असल्याचे म्हटले जाते. अकोला शहरातील एका घटनेत विवाहीतेने दिराच्या मदतीने आपल्या पतीची हत्या केल्याची घटना काही दिवसांपुर्वी उघडकीस आली. अकोला शहराच्या खडकी भागातील म्हाडा कॉलनी परिसरात आकाश इंदोरे आणि दिव्या इंदोरे हे पती पत्नी रहात होते. दोन वर्षापुर्वी आकाशचे वडील गजानन इंदोरे यांचे निधन झाले होते. त्यामुळे त्याची आई सविता इंदोरे, पत्नी दिव्या आणि दोन मुली अशा चोघांची जबाबदारी आकाशवर आली होती. मात्र चुकीची संगत लाभलेला आकाश आपल्या जबाबदारीचे भान विसरला. त्याला मद्यप्राशन करण्याचा नाद लागला. मद्यप्राशन केल्यानंतर तो घरात वाद घालत असे. त्याच्या या त्रासाला त्याची पत्नी दिव्या आणि आई सविता या दोन्ही वैतागल्या होता. घरात कुणीतरी जबाबदार कर्ता पुरुष हवा असा विचार आकाशची आई सविता इंदोरे यांनी मनाशी केला. त्यामुळे त्यांनी आपला भाचा म्हणजे लहान बहिणीचा मुलगा अजय संतोष मांजरे यास आपल्याकडे राहण्यासाठी बोलावून घेतले. सविता इंदोरे या मावशीकडे अजय राहू लागला. सख्ख्या मावशीचा मुलगा असल्यामुळे अजय मांजरे हा सर्वांचा विश्वासू होता. अविवाहीत अजय हा अकोला येथे खासगी नोकरी करत होता. लवकरच त्याने मावशी सवितासह घरातील सर्वांची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. कुणाला काय हवे, काय नको, कुणाची काय अडचण आहे या सर्व गोष्टी तो जबाबदारीने बघू लागला. अजय दिवसभर खासगी नोकरीनिमीत्त घराबाहेर रहात होता. सायंकाळी काम आटोपल्यानंतर तो मावशीच्या घरी परत येत असे. बघता बघता आकाशची पत्नी दिव्या आणि अजय मांजरे यांच्यात जवळीक निर्माण झाली. दोघे एकमेकांच्या सहवासात आले. दिव्याचा पती आकाश नेहमी मद्याच्या आहारी जात असे. त्यामुळे त्याचे घरात लक्ष नव्हते. त्यामुळे दिव्याला मावस दीर अजयचे आकर्षण निर्माण झाले. ती विवाहीत असून देखील पतीच्या प्रेमाला पारखी झाली होती. त्यातून दिव्या आणि अजय एकमेकांच्या जवळ आले. दोघांच्या प्रेमाचा गंध कित्येक दिवस कुणालाही लागला नाही. एकांत मिळाला म्हणजे दोघे एकमेकांच्या संपर्कात येत असल्याचे म्हटले जात होते. चोरुन लपून सुरु असलेले दिव्या आणि अजय यांच्यातील संबंध पटकन कुणाच्या लक्षात आले नाही. मात्र मद्याच्या आहारी जाणारा दिव्याचा पती आकाश हा आपल्या प्रेमातील अडसर असल्याचे दोघांनी ओळखले. त्यामुळे त्याचा कायमचा काटा काढण्याचे दोघांनी ठरवले. आकाशची आई आणि अजयची मावशी सविता इंदोरे या अजयला आपल्या मुलासारखी वागणूक देत होत्या. अजय आणि सून दिव्या यांच्या प्रेमसंबंधाची त्यांना कधी शंका आली नाही. दरम्यान अजय आणि दिव्या यांनी आपल्या प्रेमाचा बराच पल्ला गाठला होता असे म्हटले जाते. २० नोव्हेंबर २०२२ च्या दुपारी नेहमीप्रमाणे आकाश मद्यप्राशन करुन घरी आला. घरी आल्यानंतर त्याने दिव्यासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. त्यावेळी अजय घरातच हजर होता. त्याच्यासमोरच आकाश त्याची पत्नी दिव्यासोबत वाद घालत होता. बघता बघता रागाच्या भरात आकाशने दिव्याला मारहाण सुरु केली. दिव्याला मारहाण होत असल्याचे बघून अजयने मध्यस्ती सुरु केली. पती पत्नीचा वाद सोडवण्यास त्याने सुरुवात केली. मात्र आकाश त्याचे ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हता. तो दिव्याला मारहाण करत होता. त्यामुळे अजयने दिव्याचा बचाव करण्यासाठी आकाशला मारहाण सुरु केली. बघता बघता अजयने दिव्याच्या मदतीने आकाशचा गळा दाबण्यास सुरुवात केली. दोघांच्या ताकदीपुढे आकाश हतबल ठरला. काही वेळातच आकाशने प्राण सोडले. आकाश मरण पावल्याचे बघून अजय आणि दिव्या दोघेही मनातून घाबरले. आकाशला हार्ट अटॅक आल्याचा कांगावा करत दोघांनी त्याचा मृतदेह जिल्हा रुग्णालयात रवाना केला. जिल्हा रुग्णालयात दाखल केल्यामुळे आकाशच्या मृत्यूप्रकरणी खदान पोलिस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. आकाशच्या मृतदेहाचे शव विच्छेदन करण्यात आले. दरम्यान घाईगर्दीत त्याच्यारील अंत्यसंस्कार देखील उरकण्यात आले. तरुण मुलगा अचानक मरण पावल्यामुळे नातेवाईकांमधे शंका कुशंका सुरु झाल्या. दरम्यान कंपनीच्या कामानिमित्त विदेशात असलेला आकाश इंदोरे याचा मावस भाऊ प्रमोद भास्कर बगाडे यास या निधनाची बातमी समजली. २५ नोव्हेंबरनंतर प्रमोद बगाडे हे विदेशातून परत आले. आल्यानंतर त्यांनी आकाशच्या मृत्यूची सखोल चौकशी केली. २ डिसेंबर रोजी मयत आकाशच्या तेराव्याच्या कार्यक्रम होता. या दिवशी जमलेल्या नातेवाईकांनी आकाशच्या मृत्यूची शंका व्यक्त केली. आकाशचा मावस भाऊ प्रमोद बगाडे यांनी घटनेच्या वेळी काढलेल्या फोटोची पाहणी केली. फोटोमधे आकाशच्या शरीरावर जखमा आणि व्रण दिसून आले. घटनेच्या दिवशी दिव्याच्या हाताला चावा घेतल्याची जखम तर अजयच्या चेह-यावर ओरबडल्याच्या जखमा होत्या. दिव्या आणि अजय हे दोघेजण काहीतरी लपवत असल्याचे नातेवाईकांनी ओळखले. अनैतीक संबंधातून आकाशची हत्या केल्याच्या निष्कर्षापर्यत नातेवाईक आले. काही दिवसांनी १३ डिसेंबर २०२२ रोजी आकाशच्या मृत्यूचा शव विच्छेदन अहवाल समोर आला. श्वास गुदमरल्याने आकाशचा मृत्यू झाल्याचा अभिप्राय जिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिका-यांनी दिला. त्यामुळे घातपाताच्या शंकेला बळ मिळाले. सर्व माहितीसह शवविच्छेदन अहवालाचा आधार घेत प्रमोद भास्कर बगाडे यांनी खदान पोलीस स्टेशनला आकाशच्या हत्येची तक्रार दिली. याप्रकरणी खदान पोलिस स्टेशनला दिव्या आकाश इंदोरे व अजय संतोष मांजरे या दोघा संशयीतांविरुद्ध भा.द.वि. ३०२, ५०४, ५०६ आणि ३४ नुसार हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातून आपली सुटका झाली असा दिव्या आणि आकाश या दोघांचा समज झाला. मात्र वैद्यकीय अहवालाच्या माध्यमातून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आणी दोघांना गजाआड जाण्याची वेळ आली. पोलिस निरीक्षक श्रीरंग सनस या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

ज्या अजयला कर्ता पुरुष म्हणून सविता इंदोरे यांनी घरात आणले होते ते घर या खूनाच्या घटनेमुळे पुन्हा कर्त्या पुरुषाविना झाले. घराची जबाबदारी पुन्हा सविता इंदोरे यांच्यावर आली. घर चालवण्यासाठी कर्त्या पुरुषाला जबाबदारीचे भान राहिले तर अशी वेळ येत नाही. पतीला आपल्या आटोक्यात ठेवण्यासह प्रापंचीक जबाबदारीची जाणीव करुन देण्याचे कसब अशा प्रसंगात गृहलक्ष्मीच्या रुपातील विवाहीतेला वापरावे लागते. गृहलक्ष्मीच्या रुपातील दिव्या इंदोरे ही विवाहीता पती आकाशला आपल्या आटोक्यात ठेवण्यात अपयशी ठरली तर मावसदीर अजयला वश करण्यात यशस्वी झाली. मनुष्य मद्यप्राशन का करतो यामागे विविध कारणे असतात.

## घर मालकाचा राग त्याने मुलीवर...

मिळाली. पोलीसांनी त्याला संशयावरून ताब्यात घेऊन त्याचेकडे बेपत्ता ज्युलियाची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपली १२ वर्षीची मुलगी ज्युलिया हिचा आपणच केल्याचे सांगून त्याने या घटनेतील सत्य माहिती पोलीसांना सांगितली. चोडण येथे तो भाडयाच्या घरात राहयला असून त्याचे पत्नीबरोबर सारखी भांडणे होत होती. त्यांना सात मुले असल्याने संसाराचा राहाट गाडा ओढताना त्याची दमछाक होत होती.हाता तोंडाचा घास पोटाला येत नव्हता. त्यामुळे तो वैतागलेला होता. लांबून परराज्यातून गोव्यात मोलमजुरीसाठी आपण आलो तरी आपल्या पाठीमागची कटकट काही संपत नाही याची त्याला जाणीव झाली होती. त्याची पत्नी ही मोलमजुरीसाठी बाहेर जात असल्याने तिचा हातभार हा संसारासाठी लागत होता. एवढे करून ही संसारात त्याची ओढाताण होत होती. त्यातून नवरा बायकोची भांडणे ही दररोजी ठरलेली होती.तो दररोज दारू पिऊन येऊन पत्नीला मारहाण करीत होता. दारु पिल्यानंतर तो सैतानच बनत होता. त्याला कशाचेच भान नव्हते. मोठी मुलगी १४ वर्षाची तर दुसरी मुलगी ज्युलिया ही १२ वर्षाची होती. बाकी ५ जण अजून लहान होते. नवरा बायकोच्या भांडणात मुलांची आभाळ होत होती.त्याचेकडे त्याचे लक्षच नव्हते. मुले कोठे ही पडून काही ही खात होती. दरिद्रियपणाचा कळसच त्याच्या वाटयाला आला होता. मोहमद सलीम हा रात्री दारू पिऊन येवून बायकोला मारहाण करीत भांडण काढत असल्याने घर मालक ही त्याच्या भांडणाला वैतागलेले होते. त्याने त्यांना घर खाली करून दुसरीकडे राहण्यास जावा असे सांगितले होते.पण दुसरीकडे त्यांना खोली परवडणारी नव्हती. तो राहत असलेली भाडयाची खोली पत्राचे शेड होते. त्यामानाने भाडे होते. दुसरीकडे मात्र कमी भाडयात त्यांना खोली मिळत नव्हती. काय करावे काय नको असे त्यांना झाले होते. मोहमद तर दारू पिऊन घरात दंगा करीत होता. त्यामुळे त्याची बायको ही त्याच्या या त्रासाला कंटाळेली होती. ती बिचारी त्याचा मार खावून मुलांच्याकडे बघून कसे बसे आपला संसार हाकत होती. नवरा बायकोचे भांडण घरमालकाने बऱ्याच वेळेला सोडविले होते. त्याने एकदा दोनदा मोहमद सलीम ची तक्रार पोलीसात देखील केली होती. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन समज देवून सोडून दिले होते. तो त्याच्या बायकोला मारहाण करीत असताना घरमालकाने मोहमद सलीम याला दोन तीन वेळा मारहाण करून आपले घर खाली करण्यास सांगितले होते. त्याचा मार खाऊन ही तो त्याच खोलीत राहत होता. त्याला इतर कुठे ही थारा नव्हता. हल्ली तर तो सगळे मजुरीचे पैसे दारूत खर्च करीत होता. सोमवार दि.९ जानेवारी रोजी तो दुपारपासूनच दारू पिऊन घरात बायकोबरोबर भांडण काढत तिला मारहाण करीत होता.रात्री उशिरापर्यत त्या दोघा नवरा बायकोची भांडणे चालली होती.दिवसभर घरमालक नव्हते. रात्री उशिरा घरमालक आल्यावर मोहमद सलीम याची दोन नंबरची मुलगी ज्युलिया हिने आपल्या वडिलांनी आपल्या आईला भांडण काढून मारहाण केल्याचे सांगितले. यावर घरमालक मोहमद सलीमवर चिडले होते. त्यांनी त्याला बोलावून घेऊन परत समज दिली आणि त्याच्या दोन कानाखाली लावून परत जर तुमचे भांडण झाले तर बघा गाठ माझ्याशी आहे असे सांगितले. घरमालकाने दोन कानाखाली लावल्याने मोहमद सलीम याला ही राग आला होता. तो अगोदरच दारूच्या नशेत होता. त्याने नशेत घरमालकालाच म्हटले तुम्ही काय माझ्या बायकोला ठेवून घेतले आहे काय? तुमचे तिच्याबरोबर काही तरी संबंध असतील म्हणून तुम्ही मला मारहाण केलीत. याचा राग घरमालकाला ही आला. कशात काही नसताना तो सरळ सरळ आपल्यावर आरोप करीत असल्याने त्यांनी परत त्याच्या दोन कानाखाली लावून आताच्या आता आपली खोली रिकामी कर असे सांगितले. त्यावर रागाच्या भरात मोहमद सलीमने ही मी तुमची खोली आताच सोडतो असे सांगून त्याने आपल्या बायकोला आणि मुलांना घेऊन गोव्यातील आपल्या नातेवाईकाडे जातो असे सांगितले. त्यावेळी त्याने जाताना काही सामान बरोबर घेतले तर तर अर्धे सामान तेथच ठेवले. त्यावेळी ज्युलिया ही घरात सामान असल्याने आपल्या आईला सांगून घरी एकटीच राहिली. घरमालकाने मारल्याने मोहमद सलीम याला राग आलेला होता. आपल्या भांडणाची तक्रार आपली मुलगी ज्युलिया हिने घरमालकाकडे केली असल्याने तिचा ही राग त्याला आला होता. नातेवाईकाडे आपल्या बायको मुलांना सोडून परत चोडण येथे येत असताना त्याने परत आपल्या घशाखाली दारू ओतली होती. तो आता रागाने लालबुंद झाला होता. दारूच्या नशेत तो घराकडे आल्यावर समोर ज्युलिया दिसल्यावर तो जास्तच भडकला होता. हिचे काही तरी बरे वाईट करायचेच या विचाराने तो घराकडे आला. ती आपल्या बरोबर येणार नाही हे त्याला माहित होते. म्हणून त्याने तिला गोड बोलून तुझ्या आईने तुला बोलविले आहे असे सांगितले. तिला घेऊन तो देवगी मानस येथील निर्जन स्थळी नेले. रात्रीच्या अंधारात त्याने आजुबाजुला कुणी नसल्याचे बघून त्याने तिचा गळा आवळयाला सुरूवात केली. दोन्ही हातानी त्याने तिचा गळा जोरात दाबून धरला. तिने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या ताकदीपुढे तिचा प्रतिकार कमी पडत होता. काही वेळातच ती निपचिप झाली. तिचे हात पाय गार पडल्यावर तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याने ओळखले. ती मेल्याची खात्री होताच तो ही भानावर आला. तो तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा विचार करू लागला मग त्याच्या डोक्यात एक विचार आला. जवळच नदी असल्याने नदी काठी झाडी झुडपे होती. त्याने ज्युलियाच्या ओढणीचे एक टोक त्याने एका झाडाला बांधले तर दुसरे टोक त्याने तिच्या कमरेला बांधून तिचा मृतदेह नदीत सोडला. तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्यावर तो नातेवाईकाकडे परत आला. त्याने पत्नीला ज्युलिया आपल्या बरोबर आली नसल्याचे सांगून ती तेथच राहिली असल्याचे सांगितले. त्याच्या बोलण्यावर त्यावेळी त्याच्या पत्नीने ही विश्वास ठेवला होता. दुसऱ्या दिवशी मंगळवार दुपार पर्यत ज्युलिया नातेवाईकाकडे आली नसल्याने तिच्या आईने जुन्या घरात जावून तिचा शोध घेतला,पण तेथे ही नव्हती. आपली मुलगी घरात नसल्याचे तिने आपल्या घरमालकाला सांगितले.त्या दोघांनी ही तिचा शोध त्या रात्री उशिरापर्यत घेतला. पण तिचा ठावठिकाणा कुठे लागला नाही म्हणून तिच्या आईने जुने गोवा पोलीस स्टेशन गाठून आपली १२ वर्षीय मुलगी ज्युलिया ही बेपत्ता असल्याचे सांगून तिचे कुणी तरी अज्ञात कारणातून अपहरण केल्याची फिर्यात दाखल केली. तिच्या फिर्यादीनुसार पोलीस बेपत्ता ज्युलियाचा शोध घेत होते. गेले चार दिवस पोलीस या घटनेचा तपास करीत होते.या दरम्यान पोलीसांना शेवटच्या क्षणी ज्युलियाला आपले वडिल मोहमद सलीम याच्या बरोबर घरातून जाताना अनेकांनी पाहिले असल्याची माहिती मिळाली. याच संशयावरून पोलीसांनी मोहमद सलीम याला ताब्यात घेऊन त्याचेकडे बेपत्ता ज्युलिया हिची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती. पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करून मुलगी ज्युलिया हिचा गळा आवळून खून केल्याचे सांगून पोलीसांना घटनास्थळ ही दाखविले. पोलीसांनी त्याला घटनास्थळी नेऊन नदीतून ज्युलियाचा मृतदेह बाहेर काढला. मृतदेह पुर्णपणे कुजलेला होता. शवच्छिेदनासाठी सरकारी रुग्णायलयात पाठवून दिला. चार दिवसांनी या घटनेचा उलघडा करण्यात पोलीसांना यश आले होते. या घटनेची फिर्याद मयत ज्युलिया हिच्या आईने जुने गोवे पोलीसात दिली असल्याने ज्युलिया सलीम (१२) हिचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी मोहमद सलीम (३५) रा.जुने गोवा मुळ बिहार याच्या विरोधात भादंवी कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गर्शनाखाली जुने गोवा पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरी.निखिल पालेकर हे करीत आहेत. नवरा बायकोची भांडणे विकोपाला गेली की त्यातून काय घडते याचा कुणी विचार करीत नाही. दारूच्या नशेत भांडण काढून बायकोला मारहाण करणे एवढेच नवऱ्याला माहित असते पण त्याच नशेत तो असे काही करून बसतो की सगळे होत्याचे नव्हते होऊन बसते हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून...

## सोलापूर जिल्हा परिदेत सीईओच्या स्वीय ...

महाविकास आघाडीची सत्ता गेली व पदाधिकाऱ्यांची मुदत संपल्यावर मात्र आमदारांचे दुर्लक्ष झाले आहे. मगे यांच्या नियुक्तीसाठी दोन कामगार नेत्यांनी साहेबांचा उंबरठा झिजविल्याची चर्चा रंगली आहे. मगे यांची शिफारस करणारे ते दोघे कोण व त्यांचा शब्द सध्या प्रशासनात परवलीचा का मानला जात आहे. अक्कलकोट व दक्षिण सोलापूरमधून शिजणारे कर्मचाऱ्यांतील राजकरण झेडपीत वजनदार ठरत असल्याचे दबक्या आवाजात बोलले जात आहे.

## सोलापूर जिल्ह्यात ३४वा रस्ता...

अतुल भोसले यांच्याकडून वाहतूक नियमाबाबत प्रबोधन देण्यात आले. यानंतर व्हिडिओ द्वारे अपघाताचा देखावा करून जनजागृती करण्यात आले. रस्ता सुरक्षा अभियान वाहतूक सप्ताह निमित्त सोलापूर जिल्हा वाहतूक शाखा, पोलीस उपनिरीक्षक चनप्पा म्हेत्रे, एएसआय सुभाष पवार हे. कॉ. मुदगूल, हणमंत कारभारी व जनजागृती वाहन सहचालक पो.कॉ. पी सी पाटील सहवाहतूक नियमांची माहिती देण्यात आली. यावेळी एएसआय संजय जमादार, मलकप्पा कोडले, अनिल बर्वे, संतोष हिरोळी, सचिन कोळी, राजू धनशेट्टी, परशुराम चौगुले, अंगणवाडी सेविका व इतर गावातील नागरिक उपस्थित होते.

## रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त माझं ...

सर्वांना देण्यात आली. शेवटी सर्व हेल्मेटधारक विद्यार्थिनींची जनजागृती बाईक रॅली काढून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोटार वाहन निरीक्षक सविता पवार यांनी केले तर आभार जुगलकिशोर तोष्णीवाल यांनी मानले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी माझं लातूर परिवाराचे अभय मिरजकर, संजय स्वामी, प्रमोद गुडे, काशिनाथ बळवंते, राहुल मातोळकर, सोमनाथ मेदगे, रत्नाकर निलंगेकर, अमर करकरे, विष्णु आष्टीकर, युवराज कांबळे, दत्तात्रय परळकर, बालाजी सुर्यवंशी, श्रीराम जाधव, मनोज आखाडे यांनी परिश्रम घेतले.

# सिद्धेश्वर यात्रेत लाखो भाविकांच्या साक्षीने 'अक्षता सोहळा' संपन्न



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेच्या दुसऱ्या दिवशी, शनिवारी दुपारी सिद्धेश्वर मंदिर तलावाच्या काठी संमती कट्ट्यावर लाखो भाविकांच्या साक्षीने पारंपरिक पद्धतीने 'अक्षता सोहळा' संपन्न झाला. या सोहळ्यास राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष उपस्थिती लावली. अक्षता सोहळा पार पडताच हर बोला हर, सिद्धेश्वर महाराज की जय'च्या जय घोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.अक्षता सोहळ्यासाठी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, सर्वश्री आमदार सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, श्रीमती प्रणिती शिंदे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलिस आयुक्त राजेंद्र माने, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले, सर्वश्री माजी आमदार दिलीप माने, विश्वनाथ चाकोते, शिवशशरण पाटील, रविकांत पाटील, बारामती ग्रोचे राजेंद्र पवार, सिद्धेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, विश्वस्त अ‍ॅड. मिलिंद थोबडे आदि उपस्थित होते. या मुख्य सोहळ्यास महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा येथून हजारो भाविक दाखल झाले होते. 'शिवयोगी सिद्धेश्वर महाराज की जय' या जयघोषात आज दुपारी २.२१ वाजता सत्यम सत्यम... दिड्डम... दिड्डमचा उच्चार झाला अन् चारही बाजूंनी अक्षतांचा वर्षाव झाला. शेकडो वर्षाची परंपरा असलेल्या ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या आज दुसऱ्या दिवशी शनिवारी श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरातील संमती कट्ट्यावर योगदंडाबरोबर अक्षता सोहळा संपन्न झाला. भक्तिमय वातावरणात झालेल्या या सोहळ्यास भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सोलापुरात ग्रामदैवत सिद्धरामेश्वर महाराज यात्रेतील पारंपरिक अक्षता सोहळा भक्ती भावात पार पडला. श्री सिद्धरामेश्वर यांच्या योगदंडाशी कुंभार कन्येचा विवाह सोहळा पार पडला. संमती कट्याजवळ गंगा पूजन व सुगडी पूजन झाले. मानकरी कुंभार यांच्याकडून दिलेल्या सुगडीचे हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजन केले. सत्यम सत्यम म्हणताच भाविकांनी अक्षता टाकल्या.

क्राईम संध्या सोमवार दि. २३ जानेवारी २०२३ ते रविवार दि. २९ जानेवारी २०२३ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ७

# सामान्य जनतेच्या पैशांची उधळपट्टी करुन मौज करणे सोलापूर महापालिका अधिकाऱ्यांना पडणार महागात!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

ऑल इंडिया सर्व्हिस रुल्स १९६८ आणि महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ ह्यांच्या विविध नियमांनुसार सरकारी कार्यालय हे सरकारी कार्यक्रम आणि कामांसाठीच राखीव आहेत, सरकारी कार्यालयात इतर खासगी कार्यक्रम आयोजित केल्यास त्यावेळी उपस्थित सर्व संबंधित सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनावर विभागीय चौकशी होऊन शिस्तभंगाची आणि कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येते. सोलापूर महानगरपालिका आयुक्त कार्यालयात बुधवार दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या वाढदिवसानिमित्त सामान्य जनतेच्या टॅक्सपी वसुल झालेल्या रक्कमेतुन लाखो रुपयांची मुक्त उधळपट्टी झाल्याचे निदर्शनास आले आहे. विद्यमान सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर महानगरपालिका आयुक्त कार्यालय हे सर्वसामान्य सोलापूरकरांच्या कष्टाच्या पैसातुन टॅक्सरुपी वसुल करण्यात आलेल्या रक्कमतुन लाखो रुपयांची सजावट करुन, केक, स्नॅक्स, महागडे गिफ्ट अश्या आलिशान पद्धतीने उधळपट्टी करण्यात आलल्याचे निदर्शनास आल्यानंतर सोलापूरातील जनतेमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. सोलापूरकर सद्या धुळ, दैनंदिन पाणी पुरवठा, खड्डेयुक्त निकृष्ट रस्ते, विस्कळीत सार्वजनिक दळणवळण, अनियमित कचरा संकलन अश्या कैक मुलभुत समस्यांनी ग्रासलेले असताना अश्या अलिशान पद्धतीने वाढदिवस साजरा करुन सर्वसामान्यांच्या पैशांची लाखो रुपयांची उधळपट्टी करुन अपमान करण्याचा बेकायदेशीर काम सोलापूर महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वतीने होत आहे. सोलापूर महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, संदीप कारंजे, उपायुक्त विद्या पोळ, मच्छिंद्र घोळप, सह्यायक आयुक्त पुष्पगंधा भगत, विक्रम पाटील, सहायक नगर रचना अधिकारी संभाजी कांबळे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी संजय धनशेट्टी, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, आयुक्तांचे स्वयी सहाय्यक राहुल कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी कस्तुरबाई चौगुले, शिपाई भास्कर सालमेटी, उद्यान कर्मचारी यल्लप्पा पुजारी आदी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या विरोधात ऑल इंडिया सर्व्हिस रुल्स १९६८ आणि महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ प्रमाणे शिस्तभंग आणि कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येण्या विषयीची तक्रार केंद्रीय नगरविकास आयोग, महाराष्ट्र राज्याचे नगरविकास विभाग आणि विभागीय आयुक्त कार्यालयाकडे गिरिकर्णिका फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय कुंदन जाधव यांनी पुराव्यानिशी इमेलद्वारे तक्रार दाखल केली आहे.

# छत्रपती संभाजीराजांच्या जयंतीचा शासकीय सोहळा साजरा होणार!

## शिंदे-फडणवीस सरकारचे माजीमंत्री आ.निलंगेकराकडून अभिनंदन!



**लातूर/प्रतिनिधी**

स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची जयंती शासकीय पातळीवर साजरी करण्याचा निर्णय घेऊन शिंदे-फडणवीस सरकारने महाराष्ट्राच्या तेजस्वी इतिहासाचा अभिमानास्पद वारसा पुढे नेला आहे, अशा शब्दांत माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. राष्ट्रपुरुष आणि थोर व्यक्तींच्या जयंतीदिनी शासकीय-निमशासकीय कार्यालयांत राष्ट्रीय दिन साजरा केला जातो. या यादीत छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीदिनाचा समावेश करून सरकारने संभाजीराजांच्या अद्वितीय पराक्रमी इतिहासाचा सन्मान केला आहे, असे माजीमंत्री आ.निलंगेकर म्हणाले. १४ मे रोजी राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांतही छत्रपती संभाजीराजांचा जयंतीदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल असेही ते म्हणाले. स्वराज्यरक्षक धर्मवीर संभाजी महाराजांचे कर्तृत्व, त्यांचे शौर्य, ज्वलंत धर्माभिमान आणि स्वराज्याप्रती असलेली अपार निष्ठा हे गुण म्हणजे महाराष्ट्राच्या तेजस्वी परंपरेचा वारसा आहेत. शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयामुळे हा तेजस्वी वारसा नव्या पिढ्यांना प्रेरणादायी ठरेल व स्वराज्य व स्वधर्माच्या अभिमानाचे संस्कार नव्या पिढ्यांवर घडविण्यास मदत होईल, असे ते म्हणाले. शासकीय पातळीवर राष्ट्रपुरुषांचे जयंती सोहळे साजरे करण्याची प्रथा आता परिपूर्ण झाली, अशा शब्दांत माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी समाधान व्यक्त केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंती सोहळ्यासंबंधी मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक राज्य सरकारने बुधवारी, १८ जानेवारी रोजी जारी केले असून राष्ट्रपुरुष व महान व्यक्तींचे जयंती सोहळे साजरे करण्याच्या कार्यक्रमासंबंधी मंत्रालय तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयांना सूचना दिल्या आहेत, अशी माहिती माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

# १ लाख २८ हजार रुपयाचा गांजा जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही




**लातूर/प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चांडेश्वर शिवार गट नंबर १६९ तालुका, जिल्हा लातूर येथे छापा टाकून शेतात झुडपामध्ये गांजाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी खाताच्या पोत्यामध्ये भरून ठेवलेला ३ किलो ६७० ग्रॅम गांजा किंमत अंदाजे १ लाख् २८ हजार ४५० रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ३ इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन द्रोणाचार्य यांच्या फिर्याद वरून १) काशिनाथ गोविंद चव्हाण, वय ६० वर्ष, राहणार हसाळा, तालुका औसा जिल्हा लातूर. याच्यासह इतर दोघांवर पोलिस ठाणे लातूर ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर नंबर. २२/२०२३ कलम २० (ब) गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (NDPS act) १९८५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. खताच्या पोत्यामध्ये भरून ठेवलेल्या गांजा सह मिळेल आलेला इसम नामे काशिनाथ गोविंद चव्हाण यास अटक करून पुढील कायदेशीर कार्यवाही करिता मुद्देमालासह पोलीस ठाणे लातूर ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे. तसेच नमूद उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशावरून जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर धाडी मारुन कार्यवाही करण्याचे सत्र सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी लातूर ग्रामीण सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा लातूरचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे, सपोनि सचिन द्रोणाचार्य , पोलीस उप निरिक्षक जाधव, सहाय्यक फौजदार राजाभाऊ सूर्यवंशी, पोलीस अंमलदार नितीन कठारे, रवी कानगुले, तुराब पठाण, सचिन धारेकर, सचिन मुंडे, चंद्रकांत केंद्रे, सदानंद योगी युसुफ शेख,संपत फड सचिन धारेकर,व दोन शासकीय पंचासह दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी चांडेश्र्वर तालुका लातूर या ठिकाणी झुडूपामध्ये लपुन गांजाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी कब्जात बाळगलेल्या १ लाख २८ हजार ४५० रुपये किंमत असलेल्या गांजासह मिळून नमूद आरोपीस अटक करून त्याच्याकडून सदरचा मुद्देमाल ३ किलो ६७० ग्रॅम एवढा गांजा जप्त केला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास लातूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

# ८० पेक्षा जास्त गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेला मोस्ट वॉन्टेड आरोपी अब्दुल्ला संजय इराणीला परभणीतून अटक



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ८० पेक्षा जास्त गंभीर गुन्हे स्वरूपाचे दाखल असलेल्या व नऊ वर्षापासून फरार असलेल्या मोस्ट वॉन्टेड आरोपीला मध्यवर्ती पोलिसांनी अटक केलीये. जबरी चोरी, चैन, मोबाईल चोरी, वाहन चोरी, खुनाचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा आणणे अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत. मोस्ट वॉन्टेड आरोपी अब्दुल्ला संजय इराणीला पोलिसांनी परभणी मधून अटक केलीये. १४ जानेवारी २०२३ मध्ये रोजी मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये संजय नैनवाणी यांची जबरीने सोन्याची चैन खेचून चोरट्या पसार झाला. प्रकरणाचा गुन्हा मध्यवर्ती पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. तेव्हा सदर प्रकरणाचा तपास पोलिसांनी सुरु केला होता. पोलिसांनी कसोशीने तांत्रिक तपास करून मोस्ट वॉन्टेड आरोपी अब्दुल्ला संजय इराणी याला परभणी मधून अटक केली. संजय अब्दुल्ला इराणी याच्यावर मुंबई व्यतिरिक्त ठाणे ग्रामीण परिसरात कर्नाटक राज्यात विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत आणि गेल्या नऊ वर्षापासून हा आरोपी फरार होता. अटक झालेला आरोपी हा मोस्ट वॉन्टेड आरोपी असून विविध पोलीस ठाण्यातील दाखल एकूण ४ मोक्का गुन्ह्यातील पाहिजे आरोपी आहे. पोलिसांनी सापळा रचून परभणी मधून बेड्या ठोकल्यात. आरोपीवर एकूण ८० पेक्षा जास्त गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत. जबरी चोरी चैन,मोबाईल चोरी वाहन चोरी,खुणाचा प्रयत्न सरकारी, कामात अडथळा आणणे अशा विविध स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे पोलीस उपयुक्त परिमंडळ परिमंडळ ४ पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपायुक्त मोतीचंद राठोड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, पोलीस गुन्हे निरीक्षक सुहास आव्हाड यांनी दिलेल्या सूचनानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश राळेभात, पोलीस हवालदार विलास जरग, पोलीस हवालदार विजय जिरे, पोलीस हवालदार प्रदीप खरमाळे यांनी ही कामगिरी केली.

# वाहन चोरी करणारा आंतरराज्यीय इराणी टोळीतील अट्टल गुन्हेगाराला कोनगांव पोलिसांनी केले जेरबंद!



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी पोलीस परिमंडळ क्षेत्रात वाहन चोरीच्या घटना अधिक होत असताना पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे सहाय्यक पोलीस आयुक्त शेळके यांनी सर्व पोलीस अधिकारी कर्मचारी यांना आपापल्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात रात्रौगस्त व नाकेबंदी करण्याचे आदेश दिले असता कोनगाव पोलिसांनी गस्ती दरम्यान एका आंतरराज्यीय इराणी टोळीतील अट्टल गुन्हेगारास अटक केली आहे.त्याच्या ताब्यातून चोरलेल्या दोन दुचाकी जप्त करण्यात यश मिळवले आहे.ऑनअली सरफराज जाफरी वय २२ रा.पिराणीपाडा शांतीनगर असे अटक आरोपीचे नाव आहे. मोटार सायकल चोरीच्या घटनांना प्रतिबंध व गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी सुचना दिल्या नंतर कोनगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार यांचे मार्गदर्शना सपोनि किरणकुमार वाघ, सपोनि अभिजीत पाटील, पोहवा पंडीत जाधव, मधुकर घोडसरे, श्याम कोळी, पोना नरेंद्र पाटील, गणेश चोरगे, नामदेव वाघ, रमाकांत साळुंखे यांनी कोनगाव परिसरात गस्त घालीत असताना पहाटे चार वाजताच्या सुमारास वासुदेव पाटीलनगर येथे ऑनअली सर्फराज जाफरी हा संशयीत रित्या मोटार सायकलसह मिळून आला.त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे केलेल्या तपासात कोनगांव पोलीस ठाण्यातील चोरीस गेलेल्या ९५ हजार रुपये किमतीच्या दोन मोटार सायकल जप्त करण्यात यश मिळविले. विशेष म्हणजे ऑनअली सर्फराज जाफरी हा आंतरराज्यीय इराणी टोळीतील गुन्हेगार असून त्याविरोधात या पूर्वी भिवंडी शांतीनगर, कल्याण महात्मा फुले, कर्नाटक बिदर गांधीगंज या तीन पोलीस ठाण्यात त्या विरोधात पाच गुन्ह्यांची नोंद आहे.

# हिंदू खाटीक मागासवर्गीय समाजाचा स्नेहसोहळा संपन्न




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील पंचायत समिति प्रशिक्षण सभागृहात गुरुवारी(दि.१९जानेवारी) हिंदू खाटीक मागासवर्गीय समाजाचा स्नेह सोहळ्याचे आयोजन वाडा तालुका हिंदू खाटीक समाजाच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाडा तालुका युवक व महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून नव्या सदस्यांना काम करण्याची संधी दिली आहे. तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पाहुण्यांच्या हस्ते गुण गौरव करण्यार आला. महिलांसाठी हळदीकुंकूच्या कार्यक्रमाचेही आयोजन केले होते. कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेशचे कार्याध्यक्ष निलेश पेंढारी, संघटक सुधीर निकम, पालघर जिल्हा अध्यक्ष नरेंद्र जधव, महाराष्ट्र प्रदेशच्या महिला आघाडी उपाध्यक्ष प्रिया घोलप, शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पालघर जिल्हा संपर्क प्रमुख निलेश गंधे, शहर प्रमुख प्रमोद घोलप आदी मान्यवर उपस्थित होते.

# जैंन स्पोर्टस् ॲकॅडमीचा ब्ल्यू संघ विजयी



**जळगाव/प्रतिनिधी**

अनुभूती निवासी स्कूलच्या मैदानावर १२ वर्षे खालील मुलांच्या आमंत्रित क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत जैन स्पोर्टस ॲकॅडमीचा ब्ल्यू संघ विजयी ठरला आहे. या स्पर्धेत शिरपूर तालुका क्रिकेट असोसिएशन शिरपूर, नाशिक क्रिकेट ॲकॅडमी नाशिक, जैन स्पोर्ट्स ॲकॅडमचा ऑरेंज जळगाव, जैन स्पोर्ट्स ॲकॅडमीचा ब्ल्यू जळगाव या चार संघांनी सहभाग घेतला होता. सर्व सामने लीग पद्धतीने खेळविण्यात आले. त्यात नाशिक क्रिकेट ॲकॅडमी सर्व सामने जिंकून आणि जैन स्पोर्ट्स ॲकॅडमी ब्ल्यू दोन सामने जिंकून अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामना जैन स्पोर्ट्स ॲकॅडमी ब्ल्यू संघ विरुद्ध नाशिक क्रिकेट ॲकॅडमी नाशिक यांच्या दरम्यान झाला. जैन स्पोर्ट्स ब्ल्यू संघाने नाणेफेक जिकून प्रथम फलंदाजी करत ३० षटकात ८ गडी बाद १०८ धावा केल्या. त्यात मानस पाटील ४२, दक्ष आठवले १९ व अहमद खान नाबाद १० धावा यांचे योगदान होते. गोलंदाजीत नाशिक क्रिकेट ॲकॅडमीतर्फे राजवीर बोथरा व मंथन पिंगळे प्रत्येकी ३ गडी बाद केले. १०९ धावांचे लक्ष्य घेऊन उतरलेल्या नाशिक क्रिकेट ॲकॅडमी संघ २१.४ षटकात सर्व गडी बाद ९५ धावा करू शकला. त्यात रियांश मुंदडा १९ आर्यन गवळी नाबाद १४ व आर्य पारख १२ धावा करू शकले. गोलंदाजीत जैन स्पोर्ट्स संघातर्फे रोनक मिश्रा व अमेय चौधरी प्रत्येकी २ गडी बाद केले तर चार फलंदाज धावबाद झाले आणि हा सामना जैन स्पोर्ट्स ब्लू संघाने १३ धावांनी जिंकला. या सामन्याचा सामनावीर पुरस्कार मानस पाटील व अमय चौधरी या दोघांना देण्यात आला. मालिकावीर म्हणून नाशिक क्रिकेट ॲकॅडमी आर्यन घोळके, उत्कृष्ट फलंदाज म्हणून जैन स्पोर्ट्स ॲकॅडमचा मानस पाटील, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून जैन स्पोर्ट्स ॲकॅडमीचा अमेय चौधरी यांचा सन्मान करण्यात आला. बक्षीस समारंभ अंतिम सामन्यानंतर लगेच घेण्यात आला. याला जैन इरिगशनच्या कृषितिर्थ मासिकाचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे यांच्या मुख्य उपस्थितीती होती. या कार्यक्रमास जैन इरिगेशनचे क्रीडा समन्वयक अरविंद देशपांडे, नाशिक संघाचे प्रशिक्षक श्रीरंग कापसे, जैन स्पोर्ट्स ॲकॅडमचे प्रशिक्षक मुस्ताक अली व तन्वीर अहमद, फजल मोहंमद व पालकवर्ग उपस्थित होते. सुत्रसंचालन जैन स्पोर्ट्स ॲकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक सुयश बुरकुल यांनी केले.

# बारा वर्षापासून फरार आरोपीला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**सोलापूर/प्रतिनिधी**

खून, खूनासह, दरोडा, जबरीचोरी, घरफोडी आदी गुन्हे दाखल असलेला व बारा वर्षापासून माढा सब जेलमधून पळालेला तसेच कळंबा जेल कोल्हापूर येथे जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या सुनील झुंबर्या काळे उर्फ बापू अशोक काळे या फरार आरोपीला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. अप्पर पोलीस महासंचालक गुन्हे अन्वेषण विभाग यांनी फरार आरोपी पकडण्याबाबत विशेष मोहीम राबविण्याबाबत पोलिसांना कळविले होते. त्या अनुषंगाने सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांना विशेष पथके तयार करून सोलापूर जिल्ह्यातील फरार आरोपींना अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पथक फरार आरोपींच्या मार्गावर होते दरोड्यातील कोर्टाने फरार घोषित केलेला आरोपी काळे हा सांगली जिल्ह्यात (पाचवा मैल निमणी, ता. तासगाव, जि. सांगली) येथे त्याचे नाव बदलून वास्तव्य करीत असल्याची माहिती मिळाली त्यावरून पथकाने वेशांतर करून सदर आरोपीची स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्यास ताब्यात घेतले. तो बारा वर्षापूर्वी माढा पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यातील माढा सबजेलमधून पळून गेलेला फरार आरोपी आहे. त्यास तासगाव येथील खुनाच्या गुन्ह्यात सांगली न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. तो कळंबा कारागृह कोल्हापूर येथे शिक्षा भोगत असताना कोविड कालावधीत रजेवर आल्यानंतर तो हजर झाला नव्हता. त्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, सहाय्यक फौजदार खाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अनिस शेख, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अक्षय डोंगरे, चालक समीर शेख यांनी केली आहे.



23 To 29 JANUARY 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 1/21/2023 8:17 PM Page 1


CMYK



# सोलापूर जिल्हा परिषदेत सीईओच्या स्वीय सहाय्यक नियुक्तीवरून कर्मचाऱ्यांत संताप

## वादग्रस्त शिवानंद मगे यांच्या नियुक्तीसाठी तीनवेळा बदली



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी आपल्या सव्वा दोन वर्षाच्या कार्यकाळात जवळपास चार स्वीय सहाय्यक बदलले आहेत. नव्याने नियुक्त केलेल्या शिवानंद मगे यांना खुर्ची देण्यासाठी तीन महिन्यात तीन वेळा त्यांची बदली करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांचे पीए म्हणून कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिवानंद मगे यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रशासन विभागाने मगे यांच्या नियुक्तीचा आदेश जारी केल्यानंतर कर्मचाऱ्यांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. मगे यांच्या यापूर्वीच्या कारकीर्दीबाबत आक्षेप घेतला जात आहे. मगे यांनी यापूर्वी कृषी व पशुसंवर्धन विभाग सभापती व अर्थ सभापतींचे पीए म्हणून काम केले आहे. त्यानंतर त्यांची बदली समाजकल्याण विभागात झाली. तेथे त्यांच्याकडे दलितवस्ती विकास योजनेचे टेबल देण्यात आले होते. पण समाजकल्याण विभागातील कामांबाबत तक्रारी झाल्या. समाजकल्याण उपायुक्त मनीषा फुले यांनी समाजकल्याणच्या कारभाराची चौकशी केली. त्यानंतर मगे यांची प्रशासन विभागात बदली करण्यात आली. पुन्हा त्यानंतर लगेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे पीए म्हणून ते रुजू झाले. येथे अजून कामाची माहिती होते न तोच पुन्हा सीईओंचे पीए म्हणून त्यांना नियक्त करण्यात आले. सोलापूर जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी दिलीप स्वामी यांना शिवानंद मगे यांची सेंद्रिय द्राक्षे चांगलीच भोवलल्याच जिल्हा परिषदेच्या आवारात चर्चिले जात आहे ,शिवानंद मगे यांच्या मागे अक्कलकोट च्या माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे व भाजप पक्षाचे चालू जिल्हाध्यक्ष यांचे वरदहस्त असल्याचे सोलापूर जिल्हा परिषदेत चर्चिले जात आहे. शिवानंद मगे यांच्या नियुक्तीसाठी दोनवर्षे राजकारण शिरल्याची चर्चा रंगली आहे. सीईओ दिलीप स्वामी यांनी पदभार घेतल्यानंतर स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत असलेले अविनाश गोडसे यांची बदली करण्यात आली. त्यावेळीच मगे यांना या पदावर आणण्याचा घाट घातला होता. तशा तयारीने मगे तेथे आलेही होते. पण गोडसे यांच्या बदलीनंतर झेडपी सदस्यांमध्ये असंतोष पसरला. ४५ सदस्यांनी अविनाश गोडसे यांची नियुक्ती कायम ठेवा म्हणून पत्र दिले. त्यामुळे हे वातावरण शमविण्यासाठी चंदनशिवे व स्वीय सहायक मल्लिकार्जुन तळवार यांच्यावर जबाबदारी दिली गेली. आता प्रशासक राजवट आल्यावर प्रशिक्षणावरून परतल्यावर सीईओ स्वामी यांनी पीए बदलला. पण पीएच्या आडून झेडपीत कर्मचाऱ्यांमध्ये चाललेले हे राजकारण आता चांगलेच तापले आहे. माध्यमिक शिक्षण विभागावर शिक्षण उपसंचालकांचा अंकुश आहे. पण येथे कर्मचारी कमी असल्याने झेडपीचे कर्मचारी नियुक्त केले जातात. सध्या माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षणाधिकारी कोण असा सवाल उपस्थित केला जात आहे. एका लिपिकाच्या बदलीसाठी दोन महिने आंदोलन सुरू असूनही नियम दाखविला जात आहे. पण मगे यांना पीएच्या खुर्चीवर आणण्यासाठी तीन महिन्यात तीनवेळा बदली करण्यात आली. त्यांच्यावर प्रशासनाची इतकी मेहरबानी का याबद्दल वेगवेगळी चर्चा रंगली आहे. मगे यांची द्राक्षशेती आहे. सेंद्रीय द्राक्षे म्हणून दरवर्षी ते अधिकारी व मर्जीतील कर्मचाऱ्यांना द्राक्षपेटी भेट देतात. या द्राक्षपेटीचा हा चमत्कार असल्याचे कर्मचाऱ्यांमधून बोलले जात आहे. झेडपीवर आत्तापर्यंत मोहिते पाटील गटांचे वर्चस्व आहे. मध्यंतरी आमदार संजय शिंदे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी समविचारीच्या माध्यमातून यंत्रणा हातात घेतली. नंतर पुन्हा मोहिते पाटील गटाचा अध्यक्ष झाला. ...पान ६ वर

## प्रधानमंत्री आवास योजनेचा २६६ कुटुंबियांना लाभ मिळण्यासाठी प्रजा सुराज्य पक्षातर्फे आमरण उपोषण




**मुंबई/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वासाठी परवडणारी घरे सोयगांव येथील स्थानिक कुटुंबांना उपलब्ध होण्यासाठी २०२० पासून सोयगाव नगरपंचायत व सोयगाव तहसिल कार्यालयात लेखी पाठपुरावा करुन व प्रत्यक्ष भेटून ही प्रशासनातील अधिकारी कार्यालयीन जबाबदारी झटकत असल्याने आत्तापर्यंत २६६ कुटुंबे प्रधानमंत्री आवास योजनेपासून वंचित राहिल्याने प्रधानमंत्री आवास योजनेची संकल्पना राबविण्यास प्रशासन उदासिन असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी २०२३ रोजी औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजा सुराज्य पक्षातर्फे आमरण उपोषण करणार आहेत. या आमरण उपोषणात अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी औरंगाबाद जिल्हा प्रशासन जबाबदार असल्याचे पत्र प्रजा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद तिगोटे यांनी औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

# भिवंडीत वाहतूक विभागातर्फे बालक पालक समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन




**भिवंडी/अभिजित हिरे**

वाहतूक पोलिसांतर्फे सूरु असलेल्या २३ व्या वाहतूक सुरक्षा सप्ताह अंतर्गत नुकताच बालक पालक समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन दादासाहेब दांडेकर विद्यालय सभागृहात भिवंडी वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त मंदार धर्माधिकारी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ,दादासाहेब दांडेकर विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक लेले, भिवंडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पो निरी मनीष पाटील, राजनोली वाहतूक शाखेचे सहाय्यक पो निरी विकास भिंगारदिवे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शहराचे मापदंड ठरविताना त्या शहरातील वाहतूक व्यवस्था कशी आहे हे पहिले जाते त्यामुळे आपल्या शहराची वाहतूक व्यवस्था चांगली ठेवण्याची जबाबदारी नागरिकांची सुध्दा असून, वाहतूक संस्कृती नागरिकांमध्ये रुजविण्यासाठी वाहतूक सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त मंदार धर्माधिकारी यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले. वाहतूक नियम हे नागरिकांसह वाहन चालकांच्या सुरक्षे साठी आहेत ना की दंड वसूल करण्यासाठी आपण चूक केली नाही तर कारवाई होणार याची जाणीव नागरीकांनी ठेवणे गरजेचे असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना हेल्मेट घालण्यासाठी आग्रह करावा असे आवाहन पत्रकार संजय भोईर यांनी केले.तर कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात वरिष्ठ पो निरी मनीष पाटील यांनी अपघातांचे काही व्हिडीओ प्रोजेक्टरच्या माध्यमा तून दाखवीत त्यामध्ये चूक कशी घडते याची माहिती देत, अपघात घडतानाचा काही सेकंदांचा वेळ महत्वाचा असून त्या क्षणाची चूक आपले अथवा इतरांचे आयुष्य उध्वस्त करू शकते याची जणीव वाहन चालकांनी बाळगली तर अपघात टळू शकतात असे सांगितले. या प्रसंगी दादासाहेब दांडेकर विद्यालयाचे विद्यार्थी, पालक रिक्षा चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कर्णवर पाटील यांनी केले. तर आभार प्रदर्शन सहाय्यक पो निरी विकास भिंगारदिवे यांनी मानले.

# उदगीर सामान्य रुग्णालयातील सोनोग्राफी विभाग दोन महिन्यापासून बंद

## डॉक्टर नसल्याने गरोदर महिलांची गैरसोय

**देवणी/शकील मनियार**

सीमावर्ती भागातील सर्वात मोठे शहर असलेल्या उदगीर शहरातील सामान्य रुग्णालयातील सोनोग्राफी विभाग मागील दोन महिन्यापासून डॉक्टरा अभावी बंद आहे. तर एक्स-रे व सिटीस्कॅन हे कर्मचाऱ्याकडून चालवले जात आहे. यासाठी तज्ञ डॉक्टरांची गरज असताना सुद्धा प्रतिनियुक्तीवर लातूर येथे पाठवले आहे. रुग्णालयात येणाऱ्या गरोदर महिलांची फार मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. सोनोग्राफी करण्यासाठी खाजगी सेंटरवर जाण्याची वेळ आलेली आहे. याशिवाय शस्त्रक्रियेसाठीचे शल्यचिकित्सक पद हे मागील अनेक वर्षापासून रिक्तच आहे. त्यामुळे प्रशासनातील अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन रुग्णांची होणारी गैरसोय टाळावी अशी मागणी जनतेतून होत आहे. उदगीर शहराची व उपनगराची लोकसंख्या अडीच लाखाच्या वर आहे. त्यामुळे उदगीर येथील नागरिकांची सोय व्हावी म्हणून शासनाने २०० खाटाचे रुग्णालय सुरू केले आहे. उदगीर शहराला लागून नांदेड जिल्हा व कर्नाटक, तेलंगणा राज्याच्या सीमा जवळ असल्या कारणाने शहरात येणारे रुग्न देखील मोठया प्रमणात आहेत. शहरात खाजगी रुग्णालय सुद्धा मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु खाजगी रुग्णालयातील खर्च परवडत नसल्याने गोरगरीब रुग्ण हे उपचारासाठी शासकीय रुग्णालयात उपचार घेतात, शासन स्तरावरून गरोदर महिला रुग्णांना मोठ्या प्रमाणात सुविधा देण्यात येतात. परंतु उदगीर येथील २०० खाटाच्या रुग्णालयात जेमतेम १०० खाटाच्या रुग्णालयास पुरेल एवढा कर्मचारी वर्ग आहे. नर्सिंग स्टाफ व वर्ग चार च्या कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता रुग्णालयात आहे. येथील समान्य रुग्णालयात पूर्णवेळ शल्यचिकित्सक नसल्या कारणाने तातडीच्या शस्त्रक्रियेसाठी रुग्णाला लातूर किंवा खाजगी रुग्णालयात जाऊन शस्त्रक्रिया करून घ्याव्या लागतात, अस्थिरोग विभाग असून नसल्यासारखा आहे, हाडाच्या शस्त्रक्रिया तर डॉक्टर असुन सुद्धा शासकीय रुग्णालयात अलीकडे बंदच आहेत. रुग्णालयातील या ढिसाळ कारभाराचा फटका मात्र सामान्य रुग्णाना बसत आहे. प्रशासनाने उदगीर येथे रुग्णालयात कायम शल्यचिकित्सक व सोनोग्राफी करण्यासाठी रेडिओलॉजिस्ट नेमण्याची मागणी जनतेकडून होत आहे.




# दावोसची गुंतवणूक म्हणजे शिंदे-फडणवीस सरकारवर टीका करणाऱ्यांना मोठी चपराक!

## भाजप गटनेते आ.प्रविण दरेकरांचा ठाकरेंना टोला

**मुंबई/प्रतिनिधी**


स्वित्झर्लंडमधील दावोस येथे भरलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने स्वतःचा ठसा उमटवत विविध कंपन्यांसोबत १ लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. ही उद्योग क्षेत्राने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर दाखवलेल्या विश्वासाची पावती आहे. दावोसची गुंतवणूक म्हणजे आमच्या शिंदे-फडणवीस सरकारवर टीका करणाऱ्यांना एक मोठी चपराक आहे, असा टोला भाजप विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना लगावला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश सचिव अखिलेश चौबे, माध्यम प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते आसिफ भामला उपस्थित होते.पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर म्हणाले कि, आज महाराष्ट्राच्या आणि गुंतवणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा दिवस आहे. महाराष्ट्रातील जनतेसमोर शिंदे-फडणवीस सरकारच्या माध्यमातून दावोस या ठिकाणी जे काही करार झाले यामुळे महाराष्ट्रातील उद्योग धंद्यांना चालना मिळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दावोस या ठिकाणी साधारणतः १ लाख ३७ हजार कोटींचे सामंजस्य करार केले आहेत. १ लाखाहून अधिक रोजगारनिर्मिती या निमित्ताने होणार असल्याचेही दरेकर यांनी सांगितले. यावेळी आमदार दरेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दावोस येथे केलेल्या सामंजस्य कराराची माहितीही दिली. दरेकर पुढे म्हणाले कि, या गुंतवणुकीमुळे आदित्य ठाकरे-उद्धव ठाकरे या आमच्या शिंदे-फडणवीस सरकारवर टीका करणाऱ्यांना एक मोठी चपराक मिळाली आहे.अडीच वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रात काय गुंतवणूक आली, महाराष्ट्राचा औद्योगिक क्षेत्रात काय विकास झाला हे आपण पाहिले. खरे म्हणजे तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दावोसला गेले पाहिजे होते. परंतु चिरंजीवांना पर्यटनाला, सहलीला पाठवले. एक कवडीची गुंतवणूक आली नाही. एक उद्योग आला नाही, असा टोलाही दरेकरांनी ठाकरे यांना लगावला. तसेच टीका-टिपण्णी करणाऱ्यांनी दावोसच्या अशा प्रकारच्या मुख्यमंत्र्यांच्या-उपमुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नानंतर चार कौतुकाचे बोल अपेक्षित होते. परंतु ते दूर राहिले उलट गुजरातला जायला पाहिजे होते, अशा प्रकारची कोटी संजय राऊत करतात. संजय राऊत यांनी आपल्या कोत्या मनोवृत्तीचे, द्वेष भावनेच्या मनोवृत्तीचे प्रदर्शन पुन्हा एकदा दाखवून दिल्याची टीका दरेकर यांनी यावेळी केली.ते पुढे म्हणाले कि, एखाद्या राज्यात गुंतवणूक यायची असेल तर स्थिर सरकार असण्याची भावना निर्माण होण्याची गरज आहे. गुंतवणूकदारांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. तेव्हाच गुंतवणुकीचा ओघ येतो. गुंतवणुकीच्या माध्यमातून स्थिर सरकार महाराष्ट्राला लाभणार आहे व गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर येणार आहे. त्यामुळे कोल्हेकुई करणाऱ्यांना चांगलीच मोठी चपराक शिंदे-फडणवीस सरकारच्या माध्यमातून दिली गेली आहे. आम्ही केवळ बोलत नाही कृतीतुन दिसून येते. सहा महिन्याच्या काळात महाराष्ट्राला प्रगतीकडे नेले जात आहे. यावर महाराष्ट्रातील तमाम जनतेचा विश्वास आहे. मुंबईला जी-२० च्या माध्यमातून कायापालट करण्याची केवळ घोषणा केली नाही तर बदललेली मुंबई आपण पाहतोय. म्हणून हे सर्व करार निश्चित वेळेत कार्यान्वित होतील. फॉक्सकॉनच्या माध्यमातून कोल्हेकुई केली जात होती त्याला उत्तर प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे सरकार देईल आणि येणाऱ्या काळात ते दिसूनही येईल, असेही दरेकर यांनी सांगितले.



# उल्हासनगर पालिकेने धोकादायक इमारतीला दिलेल्या नोटीसीमुळे हरपाल रामसिंघानी यांना नाहक मारहाण!

**उल्हासनगर/सुनील तांबे**

उल्हासनगरातील बॅरेक नंबर ५८६ रुम नंबर ९ या ठिकाणी उभ्या असलेल्या धोकादायक इमारतीमुळे आजु बाजूच्या निवासकांना तोडु कारवाईचा संतापजनक मानसिक त्रास होत असून योग्य जबाबदारी न घेतल्या कारणांमुळे मालमत्तेचे नुकसान होत असलेल्या बाबत संबधितांनी तक्रार केली असता धोकादायक इमारतीतील रहिवासियांनी राग व डुक मनात धरून बाधितांच्या घरात घुसून मारहाण व शिवीगाळ केल्याने युक्त म्हण उलटा चोर कोतवाल को डाटे अशी प्रत्ययास आली आहे. सदर बाबत हकिकत अशी कि तक्रारदार हरपाल भावनदास रामसिंघानी वय वर्षे ६२ रा. बॅरेक नंबर ५८६ रूम नंबर ९ आनंदपुरं दरबार च्या बाजुला ओटी सेक्शन २ उल्हासनगर २ यांच्या शेजारी बॅरेक नंबर ८६/१०,११,१२ तळमजला अधिक दोन माळे अशी धोकादायक मालमत्ता कमल लालचंदानी, विशाल महेश लालचंदानी, साहिल कमल लालचंदानी यांच्या मालकिची आहे. या मालमत्तेच्या निष्काशनासाठी नोटिस देउन तोडु कारवाई करण्यास उमनपाने परवानगी दिली पण त्याच बरोबर आजु बाजूच्या लोकांनाही आपली मालमत्ता खाली करण्याची नोटीस बजावली, त्यानुसार तक्रारदार हरपाल यांनी वारंवार संबंधित इमारत निष्कासित करणाऱ्या सुरज यादव व भंगारवाला ईरशाद यांना योग्य जबाबदारी व खबरदारी घेण्याचे सांगितले. जेणेकरून इतरांच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही याच गोष्टीचा राग धरून सुरज यादव व भंगारवाला यांनी हरपाल यांच्या घरात घुसून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामध्ये हरपाल हे जखमी झाले आहे. त्यानुसार उल्हासनगर पोलीस ठाण्यात हरपाल यांनी तक्रार केली असता अदाखपत्र गुन्हा नोंद क्रमांक २६/२०२३ भादवि कलम ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या सगळ्या प्रकरणात उल्हासनगर महापालिकेच्या अधिकाऱ्यांची संदिग्ध भुमिका असल्याने हे प्रकरण चिघळले आहे.



# सोलापूर जिल्ह्यात ३४वा रस्ता सुरक्षा सप्ताह संपन्न



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे सोलापूर जिल्हा वाहतूक शाखा व वळसंग पोलीस ठाणे यांच्या संयुक्त सहकार्याने गावागावात रस्ता सुरक्षा अभियान वाहतूक सप्ताह सुरुवात करण्यात आली आहे. यानिमित्त वाहन चालकांना, कॉलेज विद्यार्थी व नागरिकांना बस स्टॅन्ड व श्री सिद्धेश्वर मंदिर येथे वळसंग पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक ...पान ६ वर

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त माझं लातूर परिवाराकडून १०१ महाविद्यालयीन तरुणींना हेल्मेट वाटप

**लातूर/करकरे आंबादास**

येथील माझं लातूर परिवार आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या संयुक्त विद्यमाने दयानंद विज्ञान महाविद्यालयातील १०१ युवतींना मोफत हेल्मेटचे वाटप करून रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय भोये यांची तर सहायक अधिकारी आशुतोष बारकुल, प्राचार्य डॉ जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ मिलिंद माने, शहर वाहतूक पोलिस निरिक्षक सुनिल बिर्ला, उपनिरीक्षक आवेज काझी, मोटार वाहन निरीक्षक शितल गोसावी, सविता पवार, माझं लातूर परिवाराचे प्रमुख सतीश तांदळे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय भोये यांनी उपस्थित विद्यार्थिनींना रस्ता सुरक्षा विषयक नियम पाळण्याचे आवाहन करून मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ जयप्रकाश दरगड यांनी माझं लातूर परिवाराच्या उपक्रमाचे कौतुक केले. शहर वाहतूक पोलिस निरिक्षक सुनिल बिर्ला, उपनिरीक्षक आवेज काझी यांनीही वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन केले. मान्यवरांच्या हस्ते १०१ तरुणींना हेल्मेट वितरीत करण्यात आले यानंतर रस्ता सुरक्षा नियम पाळण्याची शपथ सभागृहात उपस्थित ...पान ६ वर



CMYK